**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. निवृत्ती सोपान भोजने (माळी),<br>मु. पो. काटी, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, काटी,<br>तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय,<br>तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५७९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, काटी,<br>तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद<br>- श्री. वाय. बी. शितोळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय,<br>तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. एम. जे. मेटे,<br>विस्तार अधिकारी (पंचायत) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-०१-२०१० |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. | १२-०२-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २३-०२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १६-०४-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) नुसार दिनांक १२-०२-२०१० रोजी विहित मुदतीत प्रतिसाद दिलेला आहे. अपिलार्थी यांनी यापूर्वी हीच माहिती विचारली होती त्यावेळी त्यांना माहिती देण्यात आली होती. याबाबतची पोच अपिलार्थीने दिलेली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांनी त्यांच्या व्दितीय अपिलात त्यांना खोटी, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली आहे असे मोघमपणे नमूद केले आहे, नेमके नमूद केलेले नाही.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. निवृत्ती सोपान भोजने (माळी), मु. पो. काटी, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, काटी, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. भास्कर दगडु जाधवर, : अपिलार्थी
सार्वजनिक बांधकाम निवासाजवळ, पार्डी रोड, जुना आय. टी. आय. कॉलेजमागे, भूम, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
प्रबंधक, शि. म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
प्राचार्य, शि. म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५८० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. भास्कर दगडु जाधवर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>प्रबंधक, शि. म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद - श्री. जाधव एस. एस. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्राचार्य, शि. म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०५-०२-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२-०२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १०-०६-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या वैयक्तीक सेवेबाबतची पेन्शनच्या संदर्भात माहिती मागितली आहे. या माहिती अर्जाच्या संदर्भात दिनांक ०५-०२-२०१० रोजी अपिलार्थीस उपलब्ध माहिती कळविण्यात आली आहे तथापि अपिलार्थी यांना मिळालेली माहिती चुकीची आहे असा त्यांचा युक्तिवाद आहे. सुनावणीच्या वेळी असे आढळून आले की, महालेखापाल यांचे दिनांक २०-०५-२००९ चे पत्र जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाले आहे. त्यावर केलेल्या कार्यवाहीच्या प्रती अपिलार्थीस अपेक्षित आहे. जन माहिती अधिकारी यांनी अशा सर्व पत्राच्या प्रती अपिलार्थीस द्याव्यात.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. भास्कर दगडु जाधवर, सार्वजनिक बांधकाम निवासाजवळ, पार्डी रोड, जुना आय. टी. आय. कॉलेजमागे, भूम, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, शि. म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, शि. म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब,

तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. पाटील मधुकर पंडीतराव,<br>रा. रोसा, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उप अभियंता, एम. एस. ई. बी. (महावितरण) कार्यालय, परंडा, जिल्हा उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, एम. एस. ई. बी. (महावितरण) कार्यालय, परंडा, जिल्हा उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५८१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, परंडा, जिल्हा उस्मानाबाद - श्री. बागूल विलास शामलाल | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, जिल्हा उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १२-०३-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १८-०५-२०१०
फेरसादर दिनांक
२१-०६-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांना त्यांच्या अनुपस्थितीबाबत-चा खुलासा आयोगास सादर करावा लागेल.त्यांना आज रोजी होणा-या सुनावणीची कल्पना सहायक अभियंता यांनी दिली होती तरीही ते सुनावणीस अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक ०८-०३-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, उस्मानाबाद यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## <u>आदेश</u>

१. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, उस्मानाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०८-०३-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

२. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, उस्मानाबाद यांनी त्यांच्या अनुपस्थितीबाबतचा खुलासा तीस दिवसाच्या आत आयोगास सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पाटील मधुकर पंडीतराव, रा. रोसा, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, परंडा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बसवराज लिंगप्पा जमादार, : अपिलार्थी
रा. निलेगांव, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भूम, तालुका भूम,
जिल्हा उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद,
उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५८२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बसवराज लिंगप्पा जमादार | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भूम, तालुका भूम,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. आर. डी. मगर,<br>विस्तार अधिकारी (पंचायत) | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद,<br>उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २२-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७-०४-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख दि. ०८-०६-२०१०

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २५-०६-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक २२-०२-२०१० च्या माहिती अर्जान्वये श्री. म्हस्के एम. एस. यांनी वेळोवेळी ज्या ज्या कार्यालयाकडे नियम विषयक पालन केलेले आहे त्यानुसार दिनांक, आवक जावक क्रमांक कार्यालयाचा /विहित प्राधिकरणाचा टपालाचा पत्ता, मालमत्तेचा प्रकार, प्रमाण, एकूण किंमत रुपये इत्यादी व त्याच्यावरती कार्यालयीन कामामध्ये अनियमीततेचा आरोप आहे का, व माहिती अधिकार नियम विषयक, अशी एकूण सहा मुद्दयावर मोघमपणे माहिती मागितली आहे. बरीच माहिती प्रश्नार्थक, खुलासे वजा स्पष्टीकरण अपेक्षित करणारी आहे. जी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या माहितीच्या व्याख्येत येत नाही ती माहिती अपिलार्थीस देय होत नाही. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचा कालावधी २००५ ते २००९ असा विस्तृत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन अपिलार्थीने मागितलेली माहिती, माहितीची व्याप्ती व नेमके स्वरुप व माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार माहिती देय होते किंवा कसे याबाबत निर्णय घेणे आवश्यक होते. तथापि या प्रकरणी तसे केल्याचे दिसून येत नाही याची गंभीर दखल आयोग घेत आहे. जन अपिलीय अधिकारी यांना कारणमिमांसेसह मुद्देनिहाय निर्णय घेण्याकरिता दक्ष राहावे लागेल.

अपिलार्थी यांना खालीलप्रमाणे माहिती देय होत आहे असे दिसून येत आहे.

१. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ ची झेरॉक्स प्रत देण्यात यावी अथवा जेथे उपलब्ध होते त्या कार्यालयाचा पत्ता.

२. श्री. म्हस्के एम. एस. यांच्यावर कार्यालयीन कामकाजामध्ये अनियमीततेबाबत चौकशी झाली असल्यास, आरोप असल्यास त्याचा तपशील.

वर नमूद केलेली माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने विनामूल्य पाठविण्याची व्यवस्था जन माहिती अधिकारी यांनी करावी. मुद्दा दोन ची माहिती उपलब्ध नसल्यास तसे अपिलार्थीस कळविण्यात यावे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

<u>**आदेश**</u>

जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भूम, जिल्हा उस्मानाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बसवराज लिंगप्पा जमादार, रा. निलेगांव, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भूम, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख रब्बानी जिलानी, : अपिलार्थी
(संपादक, सा. युवा मशाल, उस्मानाबाद), सईस गल्ली,
वैराग रोड, उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,
उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५८३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, उस्मानाबाद - श्री. माने एस. डी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९-०४-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १३-०५-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-०६-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी दिनांक ०९-०३-२०१० च्या अर्जान्वये मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस दिनांक ०६-१०-२०१० रोजी विनामूल्य मिळालेली आहे. याबाबतची पोच अपिलार्थी यांनी दिलेली आहे. या सर्व बाबी आयोगापुढील कागदपत्रावरुन दिसून येत आहेत.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख रब्बानी जिलानी, (संपादक, सा. युवा मशाल, उस्मानाबाद), सईस गल्ली, वैराग रोड, उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अंबादास बाळासाहेब व-हाडे, : अपिलार्थी
वेताळनगर, तुळजापूर, तालुका तुळजापूर,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यकारी अभियंता, पाटबंधारे प्रकल्प मजबुतीकरण विभाग, उमरगा, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
अधीक्षक अभियंता, उस्मानाबाद पाटबंधारे मंडळ, सिंचन भवन, उस्मानाबाद

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५८४

२ सुनावणीची तारीख दि. ०१-०३-२०१२

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : अनुपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
कार्यकारी अभियंता, पाटबंधारे प्रकल्प मजबुतीकरण विभाग, उमरगा, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद
- श्री. अरुण देविदास माने

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित
अधीक्षक अभियंता, उस्मानाबाद पाटबंधारे मंडळ, उस्मानाबाद - श्री. आबासाहेब दादासाहेब कोकाटे

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख दि. २१-०४-२०१०

५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख दि. १०-०५-२०१०

६ प्रथम अपील केल्याची तारीख दि. १७-०५-२०१०

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख दि. ०८-०६-२०१०

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २८-०६-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी दिनांक २१-०४-२०१० च्या माहिती अर्जान्वये त्रयस्थ श्री. डी. ए. शहाणे यांची व्यक्तिगत माहिती सन २००० ते २००९ या कालावधीची मागितली आहे. सदरची माहिती ही त्रयस्थाची माहिती असल्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (७) व कलम ११ नुसार त्रयस्थास त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात आली तेव्हा त्रयस्थाने अपिलार्थीस माहिती देण्यात येऊ नये असे लेखी कळविले आहे त्यामुळे १० मे २०१० च्या पत्राने अपिलार्थीस तसे कळविण्यात आले. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, उस्मानाबाद पाटबंधारे मंडळ, उस्मानाबाद यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिला आहे की, मुद्दा क्रमांक १ ते ९ बाबतची माहिती धारिकेतील पत्रव्यवहाराच्या संदर्भात उपलब्ध असल्यास देण्यात यावी व मुद्दा क्रमांक १० ची माहिती देता येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील प्रथम अपील सुनावणीमध्ये अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीमध्ये वरिष्ठ कार्यालयाचे नाव, पत्ता व आवक जावक क्रमांक एवढीच माहिती मागिलेली आहे ही बाब विचारात घेण्यात आल्याचे दिसून येत नाही. दूरदर्शन संच किंवा दुचाकी वाहन खरेदी करत असताना वरिष्ठांची परवानगी घेतली असेल तर अशा परिस्थितीत वरिष्ठ कार्यालयाचे नाव, पत्ता व आवक जावक क्रमांक एवढीच माहिती देणे अभिप्रेत होते. मुद्दा क्रमांक ९ व १० मधील माहिती माहिती अधिकार अधिनियमाचे कलम 8 (1) (j) नुसार देय होत नाही.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व अपिलार्थीचा अर्ज विचारात घेता अपिलार्थीने फार मोठ्या कालावधीची माहिती मागितली असल्याचे दिसून येत आहे. ही माहिती एकत्र करण्यास जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाची साधनसामग्री व मनुष्यबळ मोठ्या प्रमाणावर वळवावे लागणार आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार ही बाब अपेक्षित नाही. माहिती अधिकार अधिनियमतील भूमिकेशी सुसंगत दृष्टीकोनातून माहितीची मागणी करणे अपेक्षित आहे. अपिलार्थी यांनी अशा प्रकारची मोघम, विस्तृत व व्यापक स्वरुपाची माहिती मागितली असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील उद्दिष्टे सफल होत नाहीत व अर्ज अव्यवहार्य ठरुन त्याचे गांभीर्य नष्ट होते असे आयोगाचे मत आहे व अशा माहिती अर्जावर विचार करता येणार नाही असे निर्णय प्रसंगी घेण्यात आलेले आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली व जी देय होते अशी माहिती अपिलार्थीस देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे त्रयस्थाची माहितीही देण्यात आली आहे. असे

कागदपत्रावरुन दिसून येत आहे. त्यामुळे या टप्प्यावर सदर प्रकरण बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अंबादास बाळासाहेब व-हाडे, वेताळनगर, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पाटबंधारे प्रकल्प मजबुतीकरण विभाग, उमरगा, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, उस्मानाबाद पाटबंधारे मंडळ, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. ज्ञानेश्वर नारायण नागरगोजे, : अपिलार्थी
रा. जयवंतनगर, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय,
भूम, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय,
भूम, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५८५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०१-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय,<br>भूम, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद - श्री. एन. एम. मुळे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय,<br>भूम, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद<br>- श्री. एच. के. नाईकवाडी | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०९-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २०-०१-२०१० |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २९-०५-२०१० फेरसादर दिनांक १२-०७-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी तालुका कृषि अधिकारी, भूम कार्यालयामार्फत विस्तार योजनेतील खते व बियाणे वाटपाबाबत तसेच विस्तार योजनेतील लाभार्थींची यादी याबाबत एकूण तीन मुद्दयांवर विस्तृत अशी सन २००० ते २००९ या कालावधीची माहिती मागितली आहे. सदरची माहिती संकलीत करण्यास काही कालावधी लागला व दिनांक २२-०२-२०१० रोजी माहिती तयार ठेवण्यात आली. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार होते, त्यांनी दिनांक १०-०३-२०१० ला माहिती घेतली आहे, माहितीची एकूण पृष्ठे २३० आहेत. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती व कालावधी विचारात घेता माहिती देण्यास लागलेला विलंब आयोगास योग्य वाटत आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांच्या व्दितीय अपिलावरुन त्यांना अपुरी व चुकीची माहिती मिळाली आहे असे त्यांनी मोघमपणे नमूद केले आहे, नेमके नमूद केलेले नाही.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०१-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. ज्ञानेश्वर नारायण नागरगोजे, रा. जयवंतनगर, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय,

भूम, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, भूम, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. संतोष प्रकाश काळे, : अपिलार्थी
भवानी रोड, दिपक चौक, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, यडोळा,
तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय,
तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५८६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, यडोळा, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद - श्री. एम. एस. आकोसकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. एम. जे. मेटे, विस्तार अधिकारी (पंचायत) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | प्रतीवर दिनांक नाही |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०१-०६-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २१-०८-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक ०१-०६-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०१-०६-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संतोष प्रकाश काळे, भवानी रोड, दिपक चौक, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, यडोळा, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सोमनाथ दादाराव डाके,<br>घर नंबर १/१८३, तांबरी विभाग, बार्शी रोड, भन्साळीच्या पाठीमागे, उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्य प्रशासकीय अधिकारी, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, मुख्यालय, उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी संचालक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., मुख्य कार्यालय, उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५८७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्य प्रशासकीय अधिकारी, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, मुख्यालय, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. मधुकर महादेव काळे, लिपीक | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी संचालक, उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., मुख्य कार्यालय, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १४-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |

६ प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०९-०६-२०१०

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १७-०८-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना देण्यात आली आहे व याबाबत अपिलार्थी, जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी यांचे दिनांक २४-०२-२०१२ चे पत्र आयोगापुढे आहे. यास्तव या अपिलावर विचार करण्याची आवश्यकता नाही असे आयोगाचे मत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सोमनाथ दादाराव डाके, घर नंबर १/१८३, तांबरी विभाग, बार्शी रोड, भन्साळीच्या पाठीमागे, उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, मुख्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी संचालक, उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., मुख्य कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. धर्मराज तानाजी सावंत, : अपिलार्थी
घाटशिळ रोड, दिपक चौक, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, मौ. वडगांव (देव),
देवसिंगा (तुळ), तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर,
तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५८८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, मौ. वडगांव (देव),<br>देवसिंगा (तुळ), तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद<br>- श्री. राऊत एस. एल. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर,<br>तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. एम. जे. मेटे,<br>विस्तार अधिकारी (पंचायत) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १३-०७-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६-०९-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना दिली आहे. माहितीची व्याप्ती मोठी होती त्यामुळे माहिती संकलीत करण्यास वेळ लागला.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांना माहिती मिळाली किंवा कसे हि बाब आयोगास ज्ञात होऊ शकत नाही. अपिलार्थीचा माहितीचा अर्ज पाहता अपिलार्थी यांनी एकूण २१ मुद्दयांवरील तीन वर्षाची विस्तृत माहिती मागितली आहे. यामध्ये दलित वस्ती सुधारणा योजना, किर्दी नोंद रजिस्टर, १२ वा वित्त आयोग, सर्व ग्रामपंचायत, तसेच यशवंत ग्राम योजना, इंदिरा आवास घरकुल योजना, महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना, तिर्थक्षेत्र विकास कार्यक्रम, विशेष घटक योजना, भारत निर्माण योजना अंतर्गत योजना, ग्रामपंचायत अंतर्गत सर्व संदर्भात अशी माहिती मागितली आहे. माहितीची व्याप्ती खूप मोठी आहे व कालावधी जास्त आहे. ही माहिती एकत्र करण्यास जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाची साधनसामग्री व मनुष्यबळ मोठ्या प्रमाणावर वळवावे लागणार आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार ही बाब अपेक्षित नाही. माहिती अधिकार अधिनियमतील भूमिकेशी सुसंगत दृष्टीकोनातून माहितीची मागणी करणे अपेक्षित आहे. अपिलार्थी यांनी अशा प्रकारची मोघम, विस्तृत व व्यापक स्वरुपाची माहिती मागितली असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील उद्दिष्टे सफल होत नाहीत व अर्ज अव्यवहार्य ठरुन त्याचे गांभीर्य नष्ट होते असे आयोगाचे मत आहे व अशा माहिती अर्जावर विचार करता येणार नाही असे निर्णय प्रसंगी घेण्यात आलेले आहेत.

या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थी यांनी माहितीची व्याप्ती कमी करुन कोणत्याही दोन मुद्दयांची माहिती मागवावी व याबाबत तसे १५ दिवसात जन माहिती अधिकारी यांना कळवावे व पुढील पंधरा दिवसात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ माहिती अर्जासंदर्भात उर्वरीत माहिती अपिलार्थीस द्यावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने कळविल्यानंतर उर्वरीत माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०१-०३-२०१२**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. धर्मराज तानाजी सावंत, घाटशिळ रोड, दिपक चौक, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, मौ. वडगांव (देव), देवसिंगा (तुळ), तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. किरण माणिकराव यादव,<br>रा.आराधवाडी,ता.तुळजापूर,जि.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत कार्यालय, मौजे वाणेवाडी, ता.तुळजापूर,<br>जि.उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती<br>कार्यालय,तुळजापूर,जि.उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५८९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय, मौजे वाणेवाडी, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय,तुळजापूर,जि.उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. मेटे एम.जे.,विस्तार अधिकारी (पं.) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २१.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २४.०६.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.०६.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |

| | | |
|---|---|---|
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३.०९.२०१०<br>(पुणे खंडपीठाकडे प्राप्त)<br>१३.०९.२०१०<br>(औ.बाद खंडपीठाकडे प्राप्त) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय घेतल्याचे दिसून येत नाही. यासाठी या प्रकरणी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर यांना जन अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे. गट विकास अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन, अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी द्यावी व अपिलार्थीच्या प्रथम अपिलासंदर्भात अधिनियमातील तरतुदीप्रमाणे यथोचित निर्णय पारित करावा.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, जि. उस्मानाबाद यांनी अपिलार्थीच्या दि. २९.०६.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. किरण माणिकराव यादव, रा. आराधवाडी तुळजापूर, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय, मौजे वाणेवाडी, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. लिमकर बलभिम सुखदेव,<br>रा.खासगाव,ता.परंडा, जि.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत कार्यालय,खासगाव,ता.परंडा,जि.उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती कार्यालय,परंडा, जि.उस्मानाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५९० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय, खासगाव, ता.परंडा, जि.उस्मानाबाद- श्री. कांबळे गुणवंत हणुमंतराव | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती कार्यालय,परंडा, जि.उस्मानाबाद - श्री. तायडे सुरेश ध्रुव, | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०७.०५.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०६.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |

८	राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख	दि. २९.०९.२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना दिलेली आहे. अपिलार्थी यांचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले पत्र आयोगासमोर आहे. त्यावरुन अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. लिमकर बलभिम सुखदेव, मु. पो. खासगाव,ता. परंडा, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय,खासगाव, ता. परंडा, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती कार्यालय,परंडा, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुरेश ऊर्फ सुर्यकांत चंद्रकांत कांबळे, : अपिलार्थी
रा.वरुड, पो.उळुप, ता.भूम,जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग,भूम, जि.उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५९१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,भूम,जि.उस्मानाबाद- श्री. ओंकार रामप्रताप चांडक | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १०.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २१.०६.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १७.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १०.०८.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.०९.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी दि. १०.०६.२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये दि. ०१.०१.२००४ ते ३१.०५.२०१० अशी सात वर्षांच्या कालावधीत शासकीय निधीमधून झालेल्या कामाबाबतची सार्वजनिक बांधकाम उपविभाग,भूम अंतर्गत एकंदर १९ मुद्यांवर विस्तृत व्याप्तीची मोठया प्रमाणात माहिती मागितली आहे. सदरची माहिती सार्वजनिक बांधकाम भूम उपविभागाशी संबंधित आहे. माहितीचे स्वरुप व कालावधी विचारात घेता अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधून विहित मुदतीत कलम ७(१)नुसार माहितीची पाहणी त्यांच्या कार्यालयात येऊन करावी व त्यानंतर हवी ती माहिती कार्यालयात देण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी यांनी नोंदणीकृत टपालाद्वारे कळविले आहे. त्याचप्रमाणे कार्यकारी अभियंता यांचेतर्फे दि. १७.०७.२०१० रोजीच्या पत्राद्वारे कळविल्याचे दिसून येत आहे. तथापि अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,उस्मानाबाद यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. १०.०६.२०१० रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती प्रचंड व विस्तृत व्याप्ती आहे त्यामुळे जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सा.बां.उपविभाग,भूम यांनी अर्जदारास दिलेले उत्तर समर्पक आहे व अर्जदारास हवी असलेली माहिती त्यांनी कार्यालयात येऊन प्रत्यक्ष पाहणी करावी व आवश्यक व माफक माहितीच्या छायांकित प्रती पुरवाव्यात, असे नमूद करुन अपील निकाली काढले. आयोगास उपलब्ध कागदपत्रांवरुन या बाबी दिसून येत आहेत. तसेच अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचा कालावधीही मोठा असल्याचे दिसून येत आहे. अशी माहिती एकत्रित करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज अव्यवहार्य ठरतो. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. प्रसंगी अशाप्रकारच्या माहिती अर्जावर माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय यापूर्वी देण्यात आलेले आहेत. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात विहित मुदतीत कळविले असल्याचे दिसून येत आहे.

या सर्व बाबी पाहता अपिलार्थीचे अपील बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक  ०१-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुरेश ऊर्फ सुर्यकांत चंद्रकांत कांबळे,रा.वरुड, पो.उळुप, ता.भूम,जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,सार्वजनिक बांधकाम उपविभाग, भूम, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुंदरराव भाऊराव पाटील, : अपिलार्थी
रा.आलेश्वर, पो.डोंजा, ता.परंडा, जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, परंडा, जि.उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),
जिल्हा परिषद, उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५९२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सुंदरराव भाऊराव पाटील | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - विस्तार अधिकारी (आयआरडीपी), पंचायत समिती, परंडा, जि. उस्मानाबाद- श्री. प्रतापराव मच्छिंद्र गलांडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परंडा, जि. उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २६.०७.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १३.०९.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.११.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले. आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना मिळाली आहे. तथापि त्यांना या अर्जासंदर्भात मिळालेली माहिती व त्यापूर्वी मिळालेली माहिती यामध्ये तफावत आहे, अशी त्यांची धारणा आहे. याकरिता अपिलार्थी यांना आवश्यक वाटल्यास संबंधित विभागाकडे रितसर अर्ज करुन त्यांच्या शंकांचे निवारण करुन घेऊ शकतात.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुंदरराव भाऊराव पाटील,रा.आलेश्वर, पो.डोंजा व्हाया- सोनारी, ता.परंडा, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी (आयआरडीपी), पंचायत समिती, परंडा, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परंडा, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शेख निसार हाजुसाहेब,<br>रा.परंडा, जि.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद शिक्षण विभाग,उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपसंचालक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, लातूर विभाग,लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५९३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. बी.एस.पवार, अधीक्षक वर्ग-२ | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - विभागीय शिक्षण उपसंचालक,लातूर विभाग,लातूर | : | अनुपस्थित |
| ३.५ | मुख्याध्यापक, सिध्दार्थ विद्यालय,आंदोरा, ता.परंडा, जि.उस्मानाबाद | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.०७.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.०८.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २२.१०.२००९

(फेरसादर, दि. २५.०१.२०१०)

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व मुख्याध्यापक, सिध्दार्थ विद्यालय,आंदोरा, ता.परंडा, जि.उस्मानाबाद उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,सिध्दार्थ विद्यालय, आंदोरा, ता.परंडा, जि.उस्मानाबाद यांनी दि. २२.०९.२००९ रोजी दिली आहे. त्यासंदर्भातील अपिलार्थी यांची पोच अभिलेखात उपलब्ध आहे.तदनंतर उपसंचालक, लातूर यांनी आदेशित केल्यानुसार दि. ०५.१०.२००९ रोजी माहिती देण्यात आली.

आज अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांच्या द्वितीय अपिलावरुन त्यांना माहिती मिळाली आहे तथापि अपूर्ण मिळाली आहे, असे मोघमपणे नमूद केले आहे. नेमके नमूद केलेले नाही.

या सर्व बाबी पाहता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख निसार हाजुसाहेब, पोलीस ठाणेसमोर, ठाकूर किराणा दुकानाच्या पाठीमागे,परंडा, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक,लातूर विभाग,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

सौ.राऊत मंजुषा रमेश, : अपिलार्थी
रा.उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
रजिस्ट्रार, श्री. शिवाजी महाविद्यालय, बाशी, ता. बार्शी,
जि.सोलापूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
प्राचार्य, श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी, ता. बार्शी,
जि.सोलापूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५९४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - रजिस्ट्रार, श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी, जि.सोलापूर - श्री. गोरे बी.आर. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - प्राचार्य, श्री. शिवाजी महाविद्यालय, बार्शी, जि.सोलापूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १६.०९.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ११.१०.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २२.१०.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अशोक बलभीम मिसाळ, : अपिलार्थी
रा. पाटसांगवी, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, पाटसांगवी,
तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भूम, तालुका भूम,
जिल्हा उस्मानाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/०४५१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०६-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, पाटसांगवी,<br>तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद - श्री. लोखंडे ए. ए. | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, भूम,<br>तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०४-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०७-०४-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २१-०७-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २०-११-२०१०
फेरसादर दिनांक
२२-०२-२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक ११-०२-२०१० च्या माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना देण्यात आलेली आहे. अपिलार्थीने त्यांना माहिती मिळाल्याबाबतची पोच दिलेली आहे.

आयोगापुढील अपिलार्थीच्या दिनांक ०२-०९-२०१० च्या पत्रावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिलेली आहे, ही बाब दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०६-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अशोक बलभीम मिसाळ, रा. पाटसांगवी, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, पाटसांगवी, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, भूम, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. भाले किरणकुमार बाबुराव, : अपिलार्थी
मु. पो. नंदगांव, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, नंदगांव,
तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर,
जिल्हा उस्मानाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/०४७४ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०६-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. भाले किरणकुमार बाबुराव | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, नंदगांव,<br>तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर,<br>जिल्हा उसमानाबाद | : अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. एम. जे. मेटे,<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, तुळजापूर | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११-१०-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २०-११-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २४-०२-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना मिळाली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक १०-१०-२०१० च्या माहिती अर्जान्वये ग्रामपंचायत, नंदगांव संदर्भात सन २००३ ते २०१० या कालावधीतील १) ग्रामपंचायत कराची वसुली सन २००३ पासून किती झाली त्याचा पावती क्रमांक व झेरॉक्स प्रत देणे व थकबाकी किती येणे आहे. २) गणेश पट्टी येथील सिमेंट बंधारा कामाचे माहितीपत्रक (इस्टीमेट) व आपण कोणत्या प्रकारे काम केले त्या खर्चाचा तपशील. ३) ग्रामपंचायतच्या स्वतःच्या वसुली निधीतून गावात केलेल्या कोणत्या कामावर किती खर्च झाला, यंत्र गुत्तेदार, मजूर यांच्या नावासह, वेगवेगळ्या बिलासह माहिती देणे व उस्मानाबाद औरंगाबाद व मुंबई या ठिकाणी कधी व कोणत्या कामासाठी किती प्रवास खर्च झाला, बस, रेल्वे व खाजगी वाहन तिकिट बिलासह माहिती देणे. अशी विस्तृत माहिती मागितली आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व अपिलार्थीचा अर्ज विचारात घेता अपिलार्थीने फार मोठ्या प्रमाणावर व मोठ्या कालावधीची माहिती मागितली असल्याचे दिसून येत आहे. ही माहिती एकत्र करण्यास जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाची साधनसामग्री व मनुष्यबळ मोठ्या प्रमाणावर वळवावे लागणार आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार ही बाब अपेक्षित नाही. माहिती अधिकार अधिनियमतील भूमिकेशी सुसंगत दृष्टीकोनातून माहितीची मागणी करणे अपेक्षित आहे. अपिलार्थी यांनी अशा प्रकारची मोघम, विस्तृत व व्यापक स्वरुपाची माहिती मागितली असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील उद्दिष्टे सफल होत नाहीत व अर्ज अव्यवहार्य ठरुन त्याचे गांभीर्य नष्ट होते असे आयोगाचे मत आहे व अशा माहिती अर्जावर विचार करता येणार नाही असे निर्णय प्रसंगी घेण्यात आलेले आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी स्वेच्छेने माहिती कमी करुन खालीलप्रमाणे माहिती द्यावी अशी आयोगास विनंती केली.

१. सन २००५ ते २००६ मध्ये दलित वस्तीमध्ये सिमेंट रस्ते बांधण्यात आले आहेत त्याची अंदाजपत्रके, त्याच्या प्रती, त्यावर झालेल्या खर्चाचा तपशील.

२. ग्रामपंचायतीमध्ये घराच्या कराची एकूण वसुली किती झाली याबाबतचा सन २००३ ते २०१० या कालावधीचा तपशील.

३. कंत्राटदाराचे नाव व त्याला दिलेल्या वर्कऑर्डरची प्रत.

४. सन २०११-१२ या वर्षात घरांची कर वसुली केलेल्या पावतीच्या झेरॉक्स प्रती.

वर नमूद केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने पाठविण्याची व्यवस्था करावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. भाले किरणकुमार बाबुराव, मु. पो. नंदगांव, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, नंदगांव, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. तानाजी रामचंद्र पाटील, : अपिलार्थी
मु. पो. काक्रंबा, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, काक्रंबा,
तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी (वर्ग-१), पंचायत समिती, तुळजापूर,
तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/११४१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०६-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. तानाजी रामचंद्र पाटील | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, मौ. काक्रंबा, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद<br>- श्री. ढवळे बी. जी. | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी (वर्ग-१), पंचायत समिती, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. मेटे एम. जे., विस्तार अधिकारी (पंचायत) | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २०-०१-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |

६ प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २१-०२-२०११

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ३०-०४-२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती मिळाली आहे. तथपि त्यांना फेरफारची नक्कल मिळाली नाही. यावर जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधी आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या या नक्कला सन १९८२ च्या आहेत. त्या अभिलेख्यामध्ये शोधूनही उपलब्ध होऊ शकल्या नाहीत. यास्तव जन माहिती अधिकारी यांनी या नक्कलाचा पुन्हा शोध घेऊन व यासंदर्भात यापूर्वीच्या ग्रामसेवकाशी संपर्क साधून अपिलार्थीस एका महिन्याच्या आत सदर माहिती उपलब्ध करुन द्यावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. तानाजी रामचंद्र पाटील, मु. पो. काक्रंबा, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, काक्रंबा, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी (वर्ग-१), पंचायत समिती, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

कुमारी मायादेवी नारायण बनसोडे, : अपिलार्थी
मु. शाहुनगर, पो. उपळे (मा.), तालुका जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय, उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
विभाग नियंत्रक, विभागीय कार्यालय, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ, उस्मानाबाद

१ अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/११५६
२ सुनावणीची तारीख दि. ०६-०३-२०१२
३ आज रोजीची उपस्थिती
३.१ अपिलार्थी - कुमारी मायादेवी नारायण बनसोडे : उपस्थित
३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय, उस्मानाबाद
- श्री. ए. टी. गायकवाड
३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित
विभाग नियंत्रक, विभागीय कार्यालय, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ, उस्मानाबाद - श्री. पी. आर. लाखाळ पाटील

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख दि. २१-१२-२०१०
५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख दि. ०३-०१-२०११

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २८-०२-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १७-०३-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३-०५-२०११<br>फेरसादर दिनांक<br>०९-०८-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनाक २१-१२-२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये वाहक (कनिष्ठ) पदाची भरती २०१० मध्ये निवड झालेल्या सर्व उमेदवारांच्या लेखी व मुलाखतीच्या गुणांची यादी, एस. सी. च्या उमेदवारांच्या गुणांची यादी व पात्र उमेदवारांची यादी अशी माहिती मागितली आहे. याबाबत दिनांक ०३-०१-२०११ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस कळविण्यात आले आहे की, वाहक (कनिष्ठ) पदासाठी पात्र उमेदवारांचे लेखी परिक्षेत व मुलाखतीत मिळालेले गुण हे त्यांचे वैयक्तिक गुण आहेत त्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (१) (घ) (ड) व (ज्ञ) नुसार सदर माहिती देता येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी पुढे असेही सांगितले की, लेखी परिक्षेत मिळालेले गुण व मुलाखत घेतलेल्या निवड समितीने दिलेल्या गुणाच्या आधारे मेरीट लिस्ट तयार करण्यात आली. प्रत्येक उमेदवारास मिळालेले गुण निवड समितीने त्यांच्या उपस्थितीत व सुरक्षा अधिकारी यांचे समक्ष सिलबंद केलेले आहेत. सदरचे गुण उघड करण्याचे अधिकार त्यांना नाहीत. अपिलकर्ते यांचे नांव लेखी परिक्षेत पास असणा-या १३३२ उमेदवारामध्ये असले तरी वाहकाची निवड यादी उमेदवारास लेखी परिक्षेत मिळालेले गुण व मुलाखतीत मिळालेले गुण एकत्रित करुन तयार केलेली आहे. तसेच प्रत्यक्ष निवड यादी ही लेखी परिक्षेत मिळालेल्या गुणांना ९० टक्के भारांक व मुलाखतीत मिऴालेल्या गुणांना १० टक्के भारांक देऊन निवड यादी तयार केलेली जाते. त्यामुळे केवळ मुलाखतीच्या गुणावर निवड होत नाही व अपिलकर्त्यांना निवड यादीतील उमेदवारांइतके गुण न मिऴाल्याने त्यांची निवड झालेली नाही. सर्व उमेदवारांचे गुण कमिटीने सिलबंद केलेले असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांचे गुण कळविलेले नाहीत, तसेच अपिलकर्ते यांना त्यांच्या वैयक्तिक गुणांबाबत माहिती देणे शक्य आहे परंतु इतर उमेदवारांच्या गुणांची यादी त्यांना पुरविता येणार नाही.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २१-०२-२०११ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांना त्यांचे वैयक्तिक लेखी व मुलाखतीमधील मार्क्स त्यांनी दिलेल्या पत्त्यावर कळवावे असा निर्णय घेतला आहे.परंतु जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने अशी गुणांची यादी प्रसिध्द केलेली नाही त्यामुऴे अपीलार्थीस ही माहीती त्यांनी दिलेली नाही. आज रोजी आयोगाने सूचित केल्यानुसार अपिलार्थीस त्यांच्या वैयक्तिक गुणांची एक प्रत देण्यात आली. ती अपिलार्थीने

स्विकारली. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये सर्व १३३२ उमेदवारांच्या गुणाची माहिती मागितली आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने अशी गुणांची यादी प्रसिध्द केलेली नाही त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती देण्यात आलेली नाही. या सर्व बाबी विचारात घेता या टप्प्यावर प्रकरण बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. भविष्यात होणा-या भरती प्रक्रियेच्या लेखी व मौखिक परिक्षेतील सर्व उमेदवारांच्या गुणांची यादी प्रसिध्द करावी, अशी शिफारस विभाग नियंत्रक,विभागीय कार्यालय,महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ,उस्मानाबाद यांना आयोगातर्फे करण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. कुमारी मायादेवी नारायण बनसोडे, मु. शाहुनगर, पो. उपळे (मा.), तालुका जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, विभागीय कार्यालय, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती .

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. वीर विनोद जीवनराव, : अपिलार्थी
रा. आळणी, ता. जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
अवेक्षक, नगर परिषद, उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर परिषद, उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/११६९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कनिष्ठ अभियंता, नगर परिषद, उस्मानाबाद - लोंढे पी.डी. | : | उपस्थित |
| ३.३ | तत्कालीन जन माहिती अधिकारी - सब ओव्हरसीर, नगर परिषद, उस्मानाबाद - थेटे व्ही.जे. | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३.११.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.०१.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०८.०३.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.०५.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.सध्याचे व तत्कालीन जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दि. ०१.०१.२००९ ते २२.११.२०१० या कालावधीमध्ये दाखल झालेल्या ले-आऊटच्या प्रतीची, मंजूर झालेल्या लेआऊटच्या प्रती व प्रलंबित ले-आऊटच्या प्रतींची माहिती मागितली आहे. अपिलार्थी माहिती व्यक्तीशः घेणार आहेत. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद,उस्मानाबाद यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन अपिलार्थीस सात दिवसांच्या आत माहिती द्यावी, असा निर्णय दिलेला आहे. जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगासमोर कथन केले की, उपरोक्त कालावधीत सुमारे ९० लेआऊटचे प्रस्ताव प्राप्त झाले असून ते वेगवेगळया टप्प्यावर आहेत. अशी माहिती एकत्रित करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज अव्यवहार्य ठरतो. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. प्रसंगी अशाप्रकारच्या माहिती अर्जांवर माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय यापूर्वी देण्यात आलेले आहेत. ही बाब प्रथम अपिलावर निर्णय देतेवेळी विचारात घेणे जन अपिलीय अधिकारी यांना आवश्यक होते. माहितीची व्याप्ती व मोघम स्वरुप विचारात घेता जन माहिती अधिकारी माहिती देऊ शकले नाहीत, असे आढळले आहे. याकरिता अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी उपलब्ध करुन देणे व त्यातील आवश्यक काही कागदपत्रांच्या प्रती अपिलार्थीस विनामूल्य देणे योग्य होईल, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, नगर परिषद, उस्मानाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेली माहिती पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या प्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. वीर विनोद जीवनराव,रा. आळणी, ता. जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, नगर परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेंडगे तानाजी बाबुराव, : अपिलार्थी
रा.भूम, ता.भूम, जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार,तहसील कार्यालय भूम, जि.उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, भूम, जि.उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१२०९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -नायब तहसीलदार(म.),तहसील कार्यालय भूम, जि.उस्मानाबाद- श्री. घोळवे एस.पी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, भूम, जि.उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०२.२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.०२.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०५.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये दि. २८.०९.२०१० ते ३१.१२.२०१० या कालावधीमध्ये तहसील कार्यालय भूम, जि.उस्मानाबाद येथील अधिवास प्रमाणपत्र या विभागात काम करण्यासाठी नेमलेल्या सर्व कर्मचारी-लिपीक, अव्वलकारकुन इ. च्या नियुक्ती आदेशाच्या प्रती, कर्मचाऱ्यांच्या दौरा रजिस्टरच्या प्रती व हालचाल नोंदवही इ.च्या प्रती तसेच कार्यालयातील सर्व विभागातील कर्मचाऱ्यांना दिलेल्या कामाच्या आदेशाच्या प्रती अशी माहिती मागितली आहे. जी माहिती उपलब्ध आहे, ती अपिलार्थीस दि. १५.०२.२०११ रोजी देण्यात आली आहे.

आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती दिल्याचे दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०६-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेंडगे तानाजी बाबुराव, शेंडगे गल्ली, पेठ, भूम, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार(म.),तहसील कार्यालय भूम, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, भूम, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. संतोष सिताराम लाटे,रा. उस्मानाबाद. | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>कक्ष अधिकारी,<br>पंचायत समिती, बार्शी, जि. सोलापूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी (वर्ग-१),<br>पंचायत समिती, बार्शी, जि. सोलापूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१२३० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. संतोष सिताराम लाटे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -कक्ष अधिकारी,पंचायत समिती, बार्शी, जि. सोलापूर- श्रीमती एस.डी.बाबर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -गट विकास अधिकारी (वर्ग-१), पंचायत समिती, बार्शी, जि. सोलापूर- श्री. ऐ.एन.नागरगोजे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०२.०२.२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | प्रतीवर दिनांक नाही. |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि ०२.०४.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.०४.२०११ (पुणे खंडपीठाकडे प्राप्त)<br>दि. ०९.०५.२०११ (औ.बाद खंडपीठाकडे प्राप्त) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. ०२.०२.२०११ रोजीच्या माहिती अर्जान्वये - मौ. कासारी येथील गट नं. १७ मधील त्रयस्थ श्री. महादेव रंगनाथ गंभीरे यांच्या गटामध्ये प्रत्यक्ष जागेवर पाहणी करुन पूर्वीच्या विहिरीच्या अस्तित्त्वाबाबत कृषि अधिकारी यांनी दिलेल्या दाखल्याची प्रत, सन २००५ ते २००९ या कालावधीत जवाहर विहीर योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या विहिरींची माहिती तसेच दि. ११.११.२०१० व १९.१०.२०१० रोजी व त्याआधी अपिलार्थी यांनी यासंदर्भात केलेल्या अर्जांवर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची प्रत - अशी माहिती मागितली आहे. अद्यापपावेतो ही माहिती त्यांना देण्यात आली नाही. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात कथन केले की, सदरची माहिती देण्याकरिता कृषि अधिकारी यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा करुनही त्यांना माहिती दिलेली नाही. त्यामुळे अपिलार्थीस माहिती देता आली नाही.

आयोगापुढील युक्तिवादावरुन असे दिसून येत आहे की, १०० टक्के अनुदानातील जवाहर योजने अंतर्गत विहिर मंजूर करतांना आवश्यक कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर अशी यादी गट विकास अधिकारी यांच्यामार्फत ७/१२ इ. आवश्यक कागदपत्रांसह प्रस्ताव वरिष्ठांकडे गट विकास अधिकारी यांच्या स्वाक्षरीने प्रस्ताव पाठविला जातो व मंजूरीनंतर गट विकास अधिकारी संबंधित कृषि अधिकारी यांच्यामार्फत संबंधित शेतकऱ्याकडे टप्प्याटप्प्याने अनुदान वितरीत करतात.

अपिलार्थी यांनी दि. ११.११.२०१० व १९.११.२०१० रोजी तक्रार अर्ज दिलेला आहे व त्यासंदर्भात माहिती अर्जाद्वारे माहिती मागितली आहे. ही माहिती अपिलार्थीस अद्यापपावेतो मिळाल्याचे दिसून येत नाही. गट विकास अधिकारी यांनी अपिलार्थी यांचे अर्ज संबंधित कृषि अधिकारी यांच्याकडे पाठविले तथापि अहवाल प्राप्त झालेला नाही. वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगास खालील दोन बाबी आढळून येत आहेत.

१) अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना अद्यापपावेतो मिळालेली नाही.अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती देय होत आहे.

२) अपिलार्थी यांनी दि. ११.११.२०१० व १९.११.२०१० रोजीच्या अर्जान्वये त्रयस्थांना बेकायदेशीररित्या मंजूर केलेल्या विहिरीबाबतच्या चौकशीच्या व कार्यवाहीच्या प्रती मागितल्या आहेत.

यासंदर्भात गट विकास अधिकारी यांनी सदरचे अर्ज गांभीर्याने न घेता संबंधित कृषि अधिकाऱ्याकडे पाठविले आहेत व त्यासंदर्भात कार्यालय प्रमुख या नात्याने कोणताही पाठपुरावा केल्याचे दिसून येत नाही. ही बाब जनहिताच्या दृष्टीने आयोगास गंभीर वाटते. यामध्ये गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बार्शी, जि.सोलापूर यांची व त्यांचे सहकारी अधिकारी/कर्मचारी यांची विभागीय चौकशी होणे आवश्यक आहे. यामध्ये वरील दोन मुद्यांचा

समावेश असणे अत्यावश्यक आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २०(२) नुसार अशी चौकशी करण्याबाबत प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग,मंत्रालय, मुंबई यांना शिफारस करण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१) जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,पंचायत समिती, बार्शी, जि. सोलापूर यांनी अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती वर नमूद केल्याप्रमाणे हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

२) प्रधान सचिव (ग्राम विकास विभाग) यांना संबंधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बार्शी, जि.सोलापूर व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सहकारी अधिकारी/कर्मचारी यांची विभागीय चौकशी करण्याची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २०(२) अनुसार शिफारस करण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०६-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संतोष सिताराम लाटे,'आप्पा निवास', बार्शी रोड, जाधववाडी फाटा, उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,पंचायत समिती, बार्शी, जि. सोलापूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी (वर्ग-१),पंचायत समिती, बार्शी, जि. सोलापूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग,मंत्रालय, मुंबई -३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. राहूल गोरख गाडे,<br>रा.आंदोरा, ता.कळंब, जि.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी,ग्रामपंचायत हिंगणगाव,<br>ता.कळंब,जि. उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पं.),<br>पंचायत समिति, कळंब, जि.उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१२७५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रामविकास अधिकारी,ग्रामपंचायत हिंगणगाव, ता.कळंब,जि.उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, कळंब, जि.उस्मानाबाद - श्री. आर.डी.तवले | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २२.०२.२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१.०३.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ११.०४.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.०५.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मौ.हिंगणगाव,ता.कळंब,जि.उस्मानाबाद ग्रामपंचायतमार्फत जलस्वराज प्रकल्प योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या कामासंदर्भात सन २००५ ते २०१० पर्यंत दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत प्राप्त निधी व खर्च, ग्रामसभेच्या प्रोसिडींगच्या प्रती - अशी विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली आहे. सदर माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती विचारात घेता, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखांची त्यांना पाहणी देऊन त्यातील आवश्यक काही कागदपत्रे अपिलार्थीस विनामूल्य देणे योग्य राहील, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, हिंगणगाव, ता.कळंब, जि.उस्मानाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेली माहिती पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या प्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राहूल गोरख गाडे, रा.आंदोरा, ता.कळंब, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी,ग्रामपंचायत हिंगणगाव, ता. कळंब, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, कळंब,

जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. राजाभाऊ देवीदास राऊत,<br>रा. आंबेवाडी, ता. जि.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.१,उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१३१४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.१, उस्मानाबाद - श्री. काळे एस.व्ही. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. एम.एम.पाटील, उपकार्यकारी अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २१.०१.२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १७.०२.२०११ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.०३.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३०.०४.२०११ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २०.०५.२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये उस्मानाबाद तालुक्यातील रस्ता दुरुस्तीची व इतर केलेल्या कामाच्यासंदर्भात मोघम स्वरुपाची माहिती मागितली आहे.नेमकी मागितलेली नाही. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता यांनी अपिलार्थीचे प्रपत्र 'अ' योग्य प्रकारे सादर न केल्यामुळे निकाली काढले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाचे सुनावणीच्या वेळी निर्णय दिला आहे की, अपिलार्थीने संदर्भित केलेल्या तीन रस्त्याची माहिती पंधरा दिवसांचे आत अपिलार्थीस द्यावी. तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १९.०५.२०११ रोजी माहिती तयार आहे असे कळविले आहे. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार होते. तथापि त्यांनी प्रतिसाद दिलेला नाही.

या सर्व बाबी विचारात घेता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुन्हा एकदा माहिती तयार असल्याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे कळवावे. तदनंतर त्यांना व्यक्तिशः विनामूल्य माहिती द्यावी. ही कार्यवाही एका महिन्याच्या आत पूर्ण करावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.१, उस्मानाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे कळवून अपिलार्थीस व्यक्तिशः विनामूल्य माहिती देण्याची कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजाभाऊ देवीदास राऊत, मु.पो.आंबेवाडी,ता. जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.१, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. नसिरोद्दीन महेबुब काझी,<br>रा.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>कर आकारणी बांधकाम परवाना विभाग प्रमुख,<br>नगर परिषद, उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१३२३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. नसिरोद्दीन महेबुब काझी | : | उपस्थित |
| ३.२ | अपिलार्थी यांचे वकील ॲड. एस.एस.भिसे | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी - कर आकारणी बांधकाम इ.विभाग प्रमुख, नगर परिषद, उस्मानाबाद - श्री. व्ही. जे. थेटे | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.५ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी -श्री. लोंढे पी.डी.,कनिष्ठ अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.०१.२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४.०२.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०७.०४.२०११ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २१.०५.२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्यांचे वकील, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांच्या वकिलांनी आयोगासमोर युक्तिवाद केला की, त्यांनी नगर परिषद, उस्मानाबादअंतर्गत बांधकाम परवान्यासंदर्भात खालीलप्रमाणे तीन मुद्यांवर माहिती मागितली आहे.

१) उस्मानाबाद शहरातील वॉर्ड क्र.२ मध्ये मंजूर झालेल्या लेआऊटची संख्या व त्यामधील (ओपन स्पेस) खुल्या जागांची संख्या

२) नगर परिषद वॉर्ड क्र.२ मध्ये नगर परिषद, उस्मानाबादच्या ताब्यात असलेल्या ओपन स्पेसची माहिती दर्शविणारी कागदपत्रे.

३) नगर परिषद वॉर्ड क्र.२ मध्ये खुल्या जागेवर बांधकामाची परवानगी देण्यात आली. त्या खुल्या जागेवर देण्यात आलेली बांधकामाची परवानगी ज्या कागदपत्रांच्या आधारे दिली गेली त्या कागदपत्रांच्या प्रती.

माहिती तयार करण्याचा प्रयत्न केलेला आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिलेली नाही. वर नमूद केल्याप्रमाणे तीन मुद्यांवरील माहिती देय होत आहे. जनहिताच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस द्यावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. ही माहिती अपिलार्थीस एक महिन्याच्या नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य दिली जाईल, याची जबाबदारी मुख्याधिकारी, नगर परिषद,उस्मानाबाद यांच्यावर राहील, असे आयोगास कलम १९(८)(क) नुसार दिलेल्या अधिकारानुसार सूचित करण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

मुख्याधिकारी, नगर परिषद, उस्मानाबाद यांनी संबंधित जन माहिती अधिकारी तथा कर आकारणी बांधकाम इ. विभाग प्रमुख, नगर परिषद, उस्मानाबाद वर नमूद केल्याप्रमाणे तीन मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवतील याची दक्षता घ्यावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. डॉ. काझी नसीरोद्दीन महेबुब, मिल्ली कॉलनी, औरंगाबाद रोड,उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कर आकारणी बांधकाम इ. विभाग प्रमुख,
नगर परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रोकडे आण्णासाहेब बाबुराव, : अपिलार्थी
रा. कुंभारी, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
पंचायत समिती,कार्यालय तुळजापूर, जि. उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती,
तुळजापूर,जि.उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१३२७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. रोकडे आण्णासाहेब बाबुराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -अधीक्षक,पंचायत समिती,कार्यालय तुळजापूर, जि. उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर,जि.उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. एम.जे.मेटे, विस्तार अधिकारी (पं.) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०१.०२.२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २१.०३.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४.०५.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे सादर करण्यात आलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी दि. ०१.०२.२०११ रोजीच्या अर्जाद्वारे विशेष घटक योजनेअंतर्गत मंजूर विहिरीच्या बांधकामाबाबत एकूण ४ मुद्यांवर माहिती मागितली आहे.ही माहिती अद्यापपर्यंत त्यांना देण्यात आलेली नाही.

अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देय होत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यास विलंब झालेला आहे. याकरिता गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, जि.उस्मानाबाद श्रीमती तृप्ती ढेरे यांनी व्यक्तिशः लक्ष घालावे.जन माहिती अधिकारी एक महिन्याच्या आत अपिलार्थीस माहिती देतील, याची खातरजमा करावी. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी आतापर्यंत माहिती दिलेली नाही. या बाबत त्यांना समज देण्यात यावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१) जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, जि.उस्मानाबाद यांनी संबंधित जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, पंचायत समिती, तुळजापूर वर नमूद केल्याप्रमाणे आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत अपिलार्थीस विनामूल्य माहिती देतील, असे व्यक्तिशः पहावे.

२) जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, जि.उस्मानाबाद यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांना वर नमूद केल्याप्रमाणे समज द्यावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०६-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रोकडे आण्णासाहेब बाबुराव,रा. कुंभारी, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक,पंचायत समिती कार्यालय तुळजापूर, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. हेमंत शिवाजीराव वडणे, : अपिलार्थी
रा.तुळजापूर, ता. तुळजापूर, जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपकुलसचिव (विशेष कक्ष विभाग),
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१३४० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. हेमंत शिवाजीराव वडणे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २६.१०.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०४.११.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १४.०२.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३.०५.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, त्यांच्या प्रथम अपिलासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिलेला नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे.याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दि. १४.०२.२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. हेमंत शिवाजीराव वडणे,द्वारा गपाट निवास, टेलिफोन भवनजवळ, मु.पो.तुळजापूर, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव (विशेष कक्ष विभाग), डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रामकृष्ण दिगंबरराव महामुनी, : अपिलार्थी
रा. कळब, जि. उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपचिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
निवासी उपजिल्हाधिकारी, उस्मानाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१३४३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०६-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (गृह), जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद - श्री. पालेवाड एस.एम. | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - निवासी उपजिल्हाधिकारी, उस्मानाबाद | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १५.११.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०९.१२.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १०.०१.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०९.०२.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २३.०५.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगासमोर कथन केले की, दि. १५.११.२०१० रोजी अपिलार्थी यांनी कळंब तालुक्यातील अधिकृत स्वातंत्र्यसैनिकाची यादी व इतर माहितीची साक्षांकित झेरॉक्स प्रत मागितली आहे. त्याचप्रमाणे स्वातंत्र्यसैनिकांना मिळणाऱ्या मानधन इत्यादी बाबत माहिती मागितली आहे. सदरची माहिती कार्यालयामध्ये तयार असून ₹४२/- चा भरणा करावा, असे दि. ०९.१२.२०१० रोजी माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७(१)नुसार विहित मुदतीत पोस्टाने कळविले आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. ०८.०२.२०११ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिला आहे की, "सहायक जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.०९.१२.२०१० चे पत्रान्वये सविस्तर उत्तर दिलेले असल्याने अपील फेटाळण्यात येते."

आज अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांनी दि. १६.०५.२०११ रोजीच्या द्वितीय अपिलामध्ये त्यांना दि.०९.१२.२०१० रोजीच्या पत्रान्वये चुकीची, अनावश्यक माहिती दिलेली आहे व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी गैरहजर असल्यामुळे अपील फेटाळले, अशी द्वितीय अपील दाखल करण्याची कारणे दर्शविलेली आहेत.त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेली स्वातंत्र्यसैनिकांबाबतची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास कथन केलेले आहे व सदरची एकूण २१ पृष्ठांची माहिती तयार असल्याचेही कथन केले. यास्तव ही माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठविणे योग्य ठरत आहे. त्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी यांचा निर्णय बाजूला ठेवण्यात येत आहे व आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (गृह), जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०६-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रामकृष्ण दिगंबरराव महामुनी, विठ्ठल भगवंत मंदिरासमोर, मु.पो.कळंब, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (गृह), उपचिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अब्दुल गनी अ.करीम हावरे, : अपिलार्थी
रा. परंडा, जि. उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याधिकारी,नगर परिषद,परंडा,जि. उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी,नगर परिषद, परंडा, जि.उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१३४४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अब्दुल गनी अ.करीम हावरे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - लिपीक (आस्थापना), नगर परिषद, परंडा, जि.उस्मानाबाद - श्री. गजानन दत्तात्रय पाटील | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद, परंडा, जि.उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.०३.२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.०४.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३.०५.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोनही बाजूंनी त्यांचे म्हणणे आयोगासमोर कथन केले.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी स्वत:बाबत एकूण ७ मुद्यांबाबत माहिती मागितली आहे. त्यातील पाच मुद्यांची माहिती त्यांना मिळाली आहे. खालील दोन मुद्यांची माहिती त्यांना मिळाली नाही.

१) जातीचे मूळ प्रमाणपत्र

२) शाळेच्या टी.सी.ची मूळ प्रत

अपिलार्थी यांनी त्यांची मूळ कागदपत्रे जात पडताळणीसाठी नगर परिषद, परंडा यांच्याकडे दाखल केली होती. ती कागदपत्रे त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर केली. तथापि आता ती कागदपत्रे उपलब्ध होत नाहीत. याकडे मुख्याधिकारी, नगर परिषद,परंडा यांचे लक्ष वेधण्यात येऊन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीसंदर्भात मुख्याधिकारी, नगर परिषद, परंडा यांनी दोन कर्मचाऱ्यांचा एक गट तयार करावा व कागदपत्रांचा शोध घ्यावा व या कार्यवाहीची दैनंदिन रोजनिशी ठेवण्यात यावी. तदनंतर अपिलार्थीस माहिती देण्यात यावी अथवा त्यासंदर्भातील निष्कर्ष कळविण्यात यावेत.मूळ कागदपत्रे असल्याने या बाबीकडे गांभीर्याने पहावे. ही कार्यवाही दोन महिन्याचे आत पूर्ण करावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

मुख्याधिकारी, नगर परिषद, परंडा, जि. उस्मानाबाद यांनी दोन कर्मचाऱ्यांचा एक गट तयार करावा व अपिलार्थीने मागितलेल्या माहितीसंदर्भातील कागदपत्रांचा शोध घ्यावा व याबाबतची दैनंदिन रोजनिशी ठेवावी. तदनंतर उपलब्ध झाल्यास अपिलार्थीस माहिती द्यावी अथवा त्यासंदर्भातील निष्कर्ष कळवावेत.मूळ कागदपत्रे असल्याने या बाबीकडे गांभीर्याने पहावे. ही कार्यवाही दोन महिन्याचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अब्दुल गनी अ.करीम हावरे मंडई पेठ,परंडा, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा लिपीक (आस्थापना), नगर परिषद, परंडा,जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद,परंडा, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुगत ज्ञानदेव गायकवाड, : अपिलार्थी
भिमनगर, कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, कळंब,
तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, कळंब, तालुका कळंब,
जिल्हा उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३८१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, कळंब,<br>तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, कळंब, जिल्हा उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १२-११-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २१-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०४-१२-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-०३-२०१० |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापूर्वी दिनांक ३०-१२-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी उपस्थित होते. त्यावेळी प्रकरणात तहसीलदार, कळंब यांच्या साक्षीसाठी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती दिनांक ०१-०२-२०१२ रोजी ठेवण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ३१-०१-२०१२ च्या पत्रान्वये तालुक्यात जिल्हा परिषद, पंचायत समिती सार्वजत्रिक निवडणूक २०१२ असल्यामुळे सुनावणीसाठी पुढील तारीख मिळण्याची विनंती केली होती त्यांची विनंती मान्य करण्यात येऊन ही सुनावणी आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. याची गंभीर दखल आयोग घेत आहे.

प्रकरणात सद्यस्थिती आयोगास अवगत होऊ शकत नाही. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्याकरिता त्यांना एक संधी देण्यात येत आहे. यास्तव प्रकरणात सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक २५-०४-२०१२ रोजी दुपारी ०३-३० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुगत ज्ञानदेव गायकवाड, भिमनगर, कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, कळंब,

तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्रीमती वंदना सदाशिव बायस, : अपिलार्थी
मु. इंदेवाडी पो. पोकर्णी (नृ), ता. जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
पोलीस उपअधीक्षक, परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
पोलीस अधीक्षक, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२७१८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्रीमती वंदना सदाशिव बायस | : | अनुपस्थित |
| ३.२ | अपिलार्थी यांचे मदतनीस- श्री. राणा गुलाबसिंह नरहारीराव | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी - पोलीस उपअधीक्षक, परभणी | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - अपर पोलीस अधीक्षक, परभणी | : | अनुपस्थित |
| ३.५ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. डी.झेड.सय्यद, पोलीस उपनिरीक्षक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १६.०८.२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २०.०९.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.११.२०११ |

या पूर्वी या प्रकरणाची सुनावणी दि. ०१.०२.२०१२ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी व त्यांचे मदतनीस उपस्थित होते. तथापि जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित

होते. त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटल्यामुळे आयोगातर्फे सुनावणीची पुढील तारीख दि. ०६.०३.२०१२ अशी निश्चित करण्यात आली होती. त्यानुसार आज सुनावणी घेण्यात येत आहे. आज सुनावणीच्या वेळी देखील जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांचे मदतनीस उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या अनुपस्थितीची आयोगातर्फे गंभीर दखल घेण्यात येत आहे व त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्याकरिता सुनावणीची पुढील तारीख देण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची पुढील सुनावणी दि. १८.०४.२०१२ रोजी दुपारी ०३.३० वा. होईल. या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्रीमती वंदना सदासिव बायस, मु.इंदेवाडी, पो. पोकर्णी(नृ), ता.जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. किसन गजानन धनेधर,<br>हॉटेल ऐश्वर्या, शॉप नं. १ व २, पुंडलीकनगर रोड,<br>औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, खुलताबाद,<br>जिल्हा औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी<br>कार्यालय, वैजापूर, जिल्हा औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/०२२२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, खुलताबाद,<br>जिल्हा औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी<br>कार्यालय, वैजापूर, जिल्हा औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०२-०९-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १८-०९-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १५-१२-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २८-०१-२०११

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापूर्वी दिनांक ०२-०२-२०१२ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित होते. प्रकरणात अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने त्यावेळी सुनावणीकरिता पुढील तारीख दिनांक ०७-०३-२०१२ अशी निश्चित करण्यात आली.

आज रोजी देखील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये ताजनापूर, तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद या गावासंदर्भात चार मुद्दयांव्दारे माहिती मागितली आहे. यापैकी मुद्दा क्रमांक ४ व्दारे अपिलार्थी यांनी माहितीशी संबंधित दप्तरची पाहणी करण्याची मागणी केली आहे. या माहितीसंदर्भात तहसीलदार, खुलताबाद यांनी दिनांक १८-०९-२०१० रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस कळविले आहे की, त्यांनी दिलेल्या अर्जातील मुद्दयांसंदर्भात संबंधित तलाठी यांचेमार्फत चौकशी करण्यात आली आहे. तसेच या पत्रासोबत त्यांनी चौकशी अहवालाची प्रत अपिलार्थी यांना पाठविल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीस माहिती घेण्याच्या दृष्टीने त्यांच्या दिनांक १५-१२-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर नव्याने सुनावणी होणे आयोगास गरजेचे वाटते. माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम 19 (8) (a) नुसार आयोगास प्राप्त झालेल्या अधिकारान्वये या प्रकरणी उपविभागीय अधिकारी, वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांना जन अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे व प्रकरण त्यांच्याकडे पाठविण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक १५-१२-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. किसन गजानन धनेधर, हॉटेल ऐश्वर्या, शॉप नं. १ व २, पुंडलीकनगर रोड, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांना (अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या प्रतीसह) या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. रोडगे एम.एन.<br>रा. उस्मानाबाद. | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>रविंद्र हायस्कूल भूम,ता.भूम, जि.उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१३५४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - मुख्याध्यापक, रविंद्र हायस्कूल, भूम, जि.उस्मानाबाद - श्री. सुतार एस.यु. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. कांबळे एम. के., कक्ष अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २५.०२.२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.०३.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३०.०४.२०११ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २५.०५.२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत.जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही, असे अधिनियमातील कलम ७(१) नुसार विहित मुदतीत कळविलेले आहे. सुनावणीच्या वेळी असेही अवगत केले की, अपिलार्थी यांच्या मूळ अर्जात संदर्भित केलेले त्रयस्थ कर्मचारी त्यावेळी त्यांच्या शाळेत कार्यरत नव्हते. त्यामुळे त्यांच्या शाळेकडे सदरची माहिती उपलब्ध नाही.

प्रसंगावशात जन माहिती अधिकारी तसेच जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी या दोघांनीही आयोगासमोर कथन केले की, संबंधित अपिलार्थी यांनी त्यांच्या संस्थेकडे आतापर्यंत एकूण १५-२० वेळा माहितीचा अर्ज दाखल केलेला आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व कागदपत्रांवरुन या बाबी दिसून येत आहेत. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार जी माहिती उपलब्ध आहे, ती देय होत आहे. माहिती उपलब्ध नसल्यामुळे देता आली नाही, असे दिसून येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रोडगे एम.एन., द्वारा श्री. गायकवाड एस.एम.'योगेश निवास', बी.फॉर्मसी कॉलेजजवळ,बार्शी रोड, उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, रविंद्र हायस्कूल, भूम, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. झाडबुके राजेंद्र रामभाऊ,<br>रा.वाशी, जि.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>आगार व्यवस्थापक,<br>महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन, भूम,जि.उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभाग नियंत्रक,<br>महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय,उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१३७० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. झाडबुके राजेंद्र रामभाऊ | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - आगार व्यवस्थापक,महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन, भूम,जि.उस्मानाबाद - श्री. तांदळे सुरेंद्र बन्सीधर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय,उस्मानाबाद - श्री. पी.आर.लाकाळपाटील | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.१२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३०.१२.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२.०२.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ३०.०५.२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दि. ०१.०४.२०१० ते ३०.११.२०१० या कालावधीतील भूम आगाराअंतर्गत बस फेऱ्यांबाबत रद्द किलोमिटर व अनुत्पादीत किलोमिटरची माहिती एकुण तीन मुद्यांद्वारे विविध मुद्यांवर प्रश्नार्थक स्वरुपाची तसेच खुलासा अपेक्षित करणारी मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मधील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येमध्ये अशाप्रकारच्या माहितीचा समावेश होत नाही, म्हणून देय होत नाही. तथापि जी माहिती उपलब्ध आहे, ती विहित मुदतीत अधिनियमातील कलम ७(१) नुसार दिल्याचे दिसून येत आहे.या सर्व बाबी पाहता अपील बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. झाडबुके राजेंद्र रामभाऊ, मु.पो.वाशी, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा आगार व्यवस्थापक,महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन, भूम,जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय,उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्रीमती कमलबाई वामनराव सोनवणे, : अपिलार्थी
रा.सिंदफळ, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तलाठी सजा सिंदफळ, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय,तुळजापूर,जि.उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१४३४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्रीमती कमलबाई वामनराव सोनवणे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तलाठी सजा सिंदफळ, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद - श्री. कोळी दत्तात्रय फूलचंद | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय,तुळजापूर,जि.उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. माने यु.व्ही. अव्वल कारकुन | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०८.०३.२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ११.०४.२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ११.०४.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १९.०४.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.०६.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती अद्यापपावेतो मिळालेली नाही. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने प्रकरणाची सद्यस्थिती आयोगास सादर करण्याकरिता कालावधी देण्याची आयोगास विनंती केली. त्यांची विनंती मान्य करण्यात येऊन आयोगातर्फे सुनावणीची पुढील तारीख देण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची पुढील सुनावणी दि. २६.०४.२०१२ रोजी सकाळी ठीक ११.३० वा. होईल. या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कमलबाई वामनराव सोनवणे,रा. सिंदफळ, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी सजा सिंदफळ, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, तुळजापूर, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. महावीर माणिकराव काटकर,<br>रा. तुळजापूर, जि.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा),<br>तहसील कार्यालय, तुळजापूर, जि.उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तुळजापूर, जि.उस्मानाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१४३५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (पुरवठा),<br>तहसील कार्यालय, तुळजापूर, जि.उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.माने<br>यु.व्ही.अव्वल कारकून | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, तुळजापूर, जि.<br>उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०२.२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०३.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.०६.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अर्जदार श्री महावीर माणिकराव काटकर, रा. वडगाव काटी, ता.तुळजापूर यांनी दि. १७.०२.२०११ रोजी मौ. वडगाव काटी येथील किरकोळ केरोसीन विक्रीबाबतची माहिती मिळणेबाबत या कार्यालयास अर्ज दाखल केला होता. तद्नुषंगाने अर्जदार यांना त्यांनी मागणी केलेली माहिती पुरविणेबाबत संबंधित किरकोळ केरोसीन परवानाधारक यांना कार्यालयाचे दि. २४.०२.२०११ रोजीच्या पत्रान्वये आदेशित केले होते. त्यांनी विहित मुदतीत माहिती न पुरविल्याने अर्जदार यांनी अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार यांचेकडे अपील दाखल केले होते. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अर्जदारास माहिती पुरविणेबाबत आदेशित केले होते. त्याप्रमाणे या कार्यालयात उपलब्ध असलेली केरोसीन संबंधातील माहिती अर्जदार यांना पुरविण्यात आलेली असून उर्वरित माहिती अर्जदार यांना पुरविणेबाबत पुनश्च किरकोळ केरोसीन परवानाधारक यांना दि. ०९.०४.२०११ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.विहित मुदतीत अपिलार्थीस माहिती देण्यात आलेली आहे. उर्वरित माहिती केरोसिन परवानाधारक यांच्याशी संबंधित असल्याने पुरविणेबाबत त्यांना आदेशित केले असल्याने अर्जदार यांचे विचाराधीन अपील फेटाळण्यात यावे, अशी आयोगास विनंती केली.

वरील बाबी विचारात घेता केरोसिन परवानाधारकाकडील माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात संकलीत करुन त्या माहितीशी संबंधित सर्व अभिलेखे अपिलार्थीस पाहणीसाठी उपलब्ध करुन देणे योग्य होईल, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, तुळजापूर, जि.उस्मानाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेली माहिती पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या प्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. महावीर माणिकराव काटकर, मु.पो.वडगाव (काटी),ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय, तुळजापूर, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तुळजापूर, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बाजीराव एकनाथ मारकड, : अपिलार्थी
रा.सोनगिरी, ता.भूम, जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत सोनगिरी, ता. भूम, जि.उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
विस्तार अधिकारी (पं.),
पंचायत समिती, भूम, ता.भूम, जि.उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१४६७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बाजीराव एकनाथ मारकड | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रामसेवक,ग्रामपंचायत सोनगिरी, ता. भूम, जि.उस्मानाबाद - श्री. एन.डी. श्रीगीरे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, भूम, ता.भूम, जि.उस्मानाबाद - श्री. व्ही. जे. वाघमारे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०९.०२.२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.०३.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०९.०५.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.०६.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोनही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दि. १६.०९.२०१० ते ३१.०१.२०११ पर्यंत ग्रामपंचायत सोनगिरी, ता. भूम, जि.उस्मानाबाद येथील मासिक मिटींग व ग्रामसभा मिटींगच्या प्रोसिडींग तसेच ठरावाच्या सत्यप्रती अशी माहिती मागितली आहे. ही माहिती त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांनी दिलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आज सुनावणीच्या वेळी सोबत आणलेला माहितीचा एक संच आयोगासमोर सादर केला. आयोगाच्या सूचनेनुसार अपिलार्थीस देण्यात आला. अपिलार्थी यांनी स्वीकारला. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार होते.

या सर्व बाबी पाहता, या टप्प्यावर अपील बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. तथापि भविष्यात जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमाअंतर्गत प्राप्त होणाऱ्या प्रत्येक माहितीसाठीच्या अर्जास व जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जासंदर्भात अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी, असे आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बाजीराव एकनाथ मारकड,मु. पो.सोनगिरी, ता.भूम, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंयायत सोनगिरी, ता. भूम, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.),पंचायत समिती, भूम, ता.भूम, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अशोक सोमनाथ गुळमिरे, : अपिलार्थी
रा. सोनारी, ता.परंडा, जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट शिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, परंडा, जि.उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१४६८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती, परंडा, जि.उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. फुलारी एस.ए. शिक्षण विस्तार अधिकारी | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.५ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. के.आर.शेवरे, कक्ष अधिकारी | | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०६.१२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१.०१.२०११ |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख -

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०८.०६.२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीपैकी बरीचशी माहिती केंद्रस्तरावर उपलब्ध असते. जी त्यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहे. ती अपिलार्थीस देण्यासाठी त्यांच्याकडे तयार आहे.

अपिलार्थी आज अनुपस्थित आहेत. त्यामुळे आता उपलब्ध माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य पाठवावी. या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, परंडा, जि.उस्मानाबाद यांनी अपिलार्थीच्या दि. ०६.१२.२०१० रोजीच्या माहिती अर्जावर विहित मुदतीत माहिती देणे आवश्यक होते. तसे केल्याचे दिसून येत नाही. याकरिता आयोगातर्फे त्यांना समज देण्यात येत आहे. भविष्यात त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमाअंतर्गत प्राप्त होणाऱ्या प्रत्येक माहितीसाठीच्या अर्जास तीस दिवसांच्या आत प्रतिसाद देण्याची दक्षता घ्यावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

१) जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, परंडा, जि.उस्मानाबाद यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली वर नमूद केल्याप्रमाणे माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच अपिलार्थीस तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

२) जन माहिती अधिकारी यांनी भविष्यात त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमाअंतर्गत प्राप्त होणाऱ्या प्रत्येक माहितीसाठीच्या अर्जास तीस दिवसांच्या आत प्रतिसाद देण्याची दक्षता घ्यावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अशोक सोमनाथ गुळमिरे,मु. पो. सोनारी, ता.परंडा,जि. उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती, परंडा, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. धोंडीबा हरीबा गुंड,<br>रा.निपाणी व्हाया मुरुड, ता.कळंब, जि.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,निपाणी, ता.कळंब,<br>जि.उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत),<br>पंचायत समिती, कळंब, ता.कळंब, जि.उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१५४६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. धोंडीबा हरीबा गुंड | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,निपाणी, ता.कळंब, जि.उस्मानाबाद - श्री. व्ही. बी. कांबळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, कळंब, ता.कळंब, जि.उस्मानाबाद - श्री. आर.डी. तवले | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०७.०३.२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०४.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २०.०६.२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दि. ०७.०३.२०११ रोजीच्या माहितीअर्जान्वये ग्रामपंचायत मौ. निपाणी, ता.कळंब मधील सन २०१० मधील १२ वा वित्त आयोग ६,७,८,९ व १० अंतर्गत मौ. निपाणी ता. कळंब येथील नवीन वस्ती कॉक्रीट रस्ता व जलस्वराज्य योजनेअंतर्गत चिंचाशेजारील पूल बांधकामाचा आराखडा व अंदाजपत्रक प्रत अशी माहिती मागितली आहे. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार आहेत. माहिती पाठविण्याकरिता ₹ ६०/- इतक्या शुल्काचा भरणा करावा असे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी नमूद केलेल्या पत्त्यावर पत्र पाठविले आहे. तथापि अपिलार्थी या पत्त्यावर राहत नसल्यामुळे सदर पत्र तामिल होऊ शकले नाही, याबाबतचा पंचनामा केल्याचे व अपिलार्थी यांचे वास्तव्य दोन ठिकाणी आहे, असेही जन माहिती अधिकारी यांनी आयोगास कथन केले.

वरील सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीकरिता उपलब्ध करुन द्यावे, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे व त्यानुसार आवश्यक कागदपत्रांच्या प्रती अपिलार्थीस विनामूल्य देण्याची व्यवस्था करण्यात यावी. पाहणीकरिता एक दिवस निश्चित करुन नोंदणीकृत टपालाद्वारे कळवावे. सुनावणीच्या वेळी माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी दि. २१.०३.२०१२ सर्वानुमते निश्चित करण्यात आला.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे दि. २१.०३.२०१२ रोजी (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) अपिलार्थीने मागितलेली माहिती पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या प्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

१. श्री. धोंडीबा हरीबा गुंड, पठाणसर यांचे घर, मंगळवार पेठ- बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,निपाणी, ता.कळंब, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत),पंचायत समिती, कळंब, ता.कळंब, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्रीमती तारामती धोंडीबा गुंड,<br>रा. निपाणी व्हाया मुरुड, ता.कळंब, जि.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कळंब, जि.उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत),<br>पंचायत समिती, कळंब, जि.उस्मानाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१५५० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| | अपिलार्थी यांचे पति- श्री. धोंडीबा हरीबा गुंड | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,निपाणी, ता.कळंब, जि.उस्मानाबाद - श्री. व्ही. बी. कांबळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, कळंब, ता.कळंब, जि.उस्मानाबाद - श्री. आर.डी. तवले | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २७.०३.२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १०.०५.२०११ |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख -

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २०.०६.२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे मौजे निपाणी येथील घर क्र. १९७ बाबत नमुना नं.८-अ च्या उताऱ्याची नक्कल प्रत, दि. २०.०६.२००२ रोजीच्या सभेतील ठराव क्र. ३ ची नक्कल व सन २००० ते २०११ पर्यंतचे सदर घराचे घरपट्टी, पाणी पट्टी, विशेष पाणी पट्टी, वीज व आरोग्य कर आकारणी व वसूलीच्या पत्रकाच्या नक्कल प्रती अशी माहिती मागितली आहे. सदर माहिती अपिलार्थी यांना अद्यापपावेतो मिळाली नाही, असे दिसून येत आहे.जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नाही. तथापि अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांच्याकडे तयार आहे. ती माहिती ते अपिलार्थीस देऊ शकतात.

वरील सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीकरिता उपलब्ध करुन द्यावे, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे व त्यानुसार आवश्यक कागदपत्रांच्या प्रती अपिलार्थीस विनामूल्य देण्याची व्यवस्था करण्यात यावी. पाहणीकरिता एक दिवस निश्चित करुन नोंदणीकृत टपालाद्वारे कळवावे. सुनावणीच्या वेळी माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी दि. २१.०३.२०१२ सर्वानुमते निश्चित करण्यात आला.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे दि. २१.०३.२०१२ रोजी (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) अपिलार्थीने मागितलेली माहिती पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या प्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्रीमती तारामती धोंडीबा गुंड, द्वारा श्री. धोंडीबा हरीबा गुंड, पठाणसर यांचे घर, मंगळवार पेठ- बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर

२. ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,निपाणी, ता.कळंब, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. विस्तार अधिकारी (पंचायत),पंचायत समिती, कळंब, ता.कळंब, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. तानाजी मुरलीधर हुंबे, : अपिलार्थी
रा.घाटनांदूर, पो.घाटपिंपरी,
ता.भूम, जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
अध्यक्ष/सचिव,
ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती,ग्रामपंचायत
घाटनांदुर, ता. भूम, जि.उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
विस्तार अधिकारी (पं.),
पंचायत समिती, भूम, ता.भूम, जि.उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१५५२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. तानाजी मुरलीधर हुंबे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रामसेवक, ग्रामपंचायत घाटनांदूर, ता. भूम, जि.उस्मानाबाद - श्री. नलावडे पी.आर. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विस्तार अधिकारी (पं.),पंचायत समिती, भूम, ता.भूम, जि.उस्मानाबाद - श्री. व्ही. जे. वाघमारे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २३.०३.२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २०.०४.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २०.०६.२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोनही बाजूंचे युक्तिवाद ऐकून घेण्यात आले. आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे - सन २००५ ते २०११ अशी सहा वर्षे कालावधीची जलस्वराज्य प्रकल्प घाटनांदूर येथील पाणीपुरवठा योजनेसंदर्भात तसेच ग्राम सभा ठरावाच्या प्रती अशी विस्तृत माहिती मागितली आहे. सदरची माहिती संकलीत करण्यास जन माहिती अधिकारी यांना काही कालावधी लागला. हे कारण माहितीची व्याप्ती विचारात घेता पुरेसे आहे, असे दिसून येत आहे. तसेच काही माहिती ग्रामीण पाणीपुरवठा समितीच्या अध्यक्षांकडून प्राप्त करुन अपिलार्थीस देण्याचा प्रयत्न केला आहे. अपिलार्थी यांना दि. १२.०८.२०११ रोजी माहिती समक्ष दिलेली आहे. यासंदर्भातील पोच अभिलेखात उपलब्ध आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. तानाजी मुरलीधर हुंबे,रा.घाटनांदूर, पो.घाटपिंपरी,ता.भूम, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत घाटनांदूर, ता. भूम, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.),पंचायत समिती, भूम, ता.भूम, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अनिल हरी धुमाळ, : अपिलार्थी
रा. वाघोली, ता.जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
उपविभागीय अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग,
जिल्हा परिषद, उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१५५७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती,उस्मानाबाद - श्री. तानाजी अंबादासराव अतकरे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपअभियंता,जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग,उस्मानाबाद - श्री. चाटे अरविंद बालाजीराव | : | उपस्थित |
| ३.४ | सरपंच, बुकनवाडी, ता.जि. उस्मानाबाद- श्री. बुकन दिलीप लिंबराज | : | उपस्थित |
| ३.५ | अध्यक्ष, जुनोनी ग्रामीण पाणी पुरवठा योजना समिती - श्री. शेख नबी वजीर | : | उपस्थित |
| ३.६ | सचिव, बावी (का) व कावलदरा(बावी)- श्री. उंडे सुहास मुरलीधर | : | उपस्थित |
| ३.७ | सचिव, वलगुड- भोंग सुग्रीव साहेबराव | : | उपस्थित |
| ३.८ | अध्यक्ष, पाणी पुरवठा समिती, सोनेगाव - श्री. प्रमोद | : | उपस्थित |

त्रिंबकराव पवार

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | २८.०२.२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १५.०४.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | २४.०५.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २०.०६.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी तसेच (१)सरपंच, बुकनवाडी, (२) अध्यक्ष, जुनोनी ग्रामीण पाणी पुरवठा योजना समिती, (३) सचिव, बावी (का), (४) सचिव, कावलदरा(बावी), (५) सचिव, वलगुड, (६) अध्यक्ष, पाणी पुरवठा समिती, सोनेगाव उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांच्याकडे तयार आहे. बावी (का),ता.जि.उस्मानाबाद ग्रामपंचायत पाणीपुरवठा समितीतर्फे त्यांना शुल्काचा भरणा करावा, असेही कळविले आहे. मुकुंदवाडी या गावाच्यासंदर्भात माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविली असता, ते माहितीचे पार्सल विनातामिली परत प्राप्त झालेले आहे. अपिलार्थी आज अनुपस्थित आहेत. त्यांना सहा गावांची माहिती विनाशुल्क प्राप्त झाली आहे. ३८ गावांची मिळाली नाही, असे त्यांनी प्रथम अपिलामध्ये नमूद केले आहे.

उपस्थित सर्वांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी हे वेळोवेळी वेगवेगळया कार्यालयामध्ये अर्ज करीत असतात. त्यांचे बरेचसे अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाले आहेत.

जन अपिलीय अधिकारी तथा उपअभियंता यांच्याकडे प्रथम अपिलावर सुनावणी ठेवली होती. त्यावेळी सर्व गावांची माहिती उपलब्ध करुन तयार ठेवण्यात आली होती. अपिलार्थी सुनावणीच्या वेळी उपस्थित होते. तथापि माहिती न स्वीकारता निघून गेले, असे सर्वांनी युक्तिवादात कथन केले.

आयोगापुढील कागदत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उस्मानाबाद यांच्याकडे ४४ गावांसंदर्भात माहिती मागितली आहे. माहिती भारत निर्माण पाणी पुरवठा योजनेची आहे. प्रत्येक ठिकाणी जन माहिती अधिकारी नियुक्त केलेले आहेत. अपिलार्थी यांनी अशाच जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करणे आवश्यक आहे. ज्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज प्राप्त झाला, त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेलीच माहिती देणे अभिप्रेत आहे व जर माहिती दुसऱ्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे असेल तर अर्ज संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम ६(३)(एक)नुसार वर्ग करणे आवश्यक आहे व त्यांच्याकडे अर्ज करण्याचे

अपिलार्थीस कळविणे गरजेचे आहे. या सर्व बाबींची नोंद घ्यावी. याकरिता अपिलार्थी यांनी स्वतंत्ररित्या अर्ज करणे आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. पूर्वकल्पना देऊनही अपिलार्थी अनुपस्थित आहेत.यामुळे अपिलार्थीच्या अनुपस्थितीची नोंद आयोग घेत आहे. त्याचप्रमाणे अपिलार्थी यांनी एकूण ४४ गावांसंदर्भात माहिती मागितलेली दिसून येत आहे.अशाप्रकारे स्वतंत्र प्राधिकरणांची एकाच प्राधिकरणाकडे माहितीचा अर्ज करुन व्यापक स्वरुपाची माहिती मागणे व्यवहार्य ठरत नाही. प्रत्येक ग्रामपंचायतीस माहिती अधिकाऱ्याची नेमणूक केलेली आहे. त्यामुळे प्रत्यक्षात त्यांना ज्या ग्रामपंचायतीसंदर्भात माहिती आवश्यक असेल त्यांच्याकडे यापुढे स्वतंत्र अर्ज करावा लागेल, याची अपिलार्थी यांनी नोंद घ्यावी. अपिलार्थी यांनी व्यापक अशी माहिती मागितलेली आहे. अशी माहिती एकत्रित करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज अव्यवहार्य ठरतो. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. प्रसंगी अशाप्रकारच्या माहिती अर्जांवर माहिती आयोगाने माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय दिलेले आहेत.

या प्रकरणात जरी विविध जन माहिती अधिकाऱ्यांकडून माहिती एकत्रित करुन सकारात्मक भूमिका घेऊन माहिती देण्यात आली असली तरीही याला पूर्वोदाहरण म्हणून भविष्यात त्याचा वापर करण्यात येऊ नये व ज्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती उपलब्ध आहे, त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदी विचारात घेऊन माहितीचा अर्ज किंवा त्यातील  आवश्यक भाग वर्ग करण्यात यावा व जास्त जन माहिती अधिकारी यांचेकडील माहिती विचारली असल्यास अपिलार्थीस अर्ज परत करण्यात येऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडे स्वतंत्र अर्ज करण्यास कळविण्यात यावे. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी परिपत्रक काढून जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना सूचित करावे, असे आयोगाचे निर्देश आहेत.

या सर्व बाबी पाहता या स्तरावर अपील बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अनिल हरि धुमाळ, रा. वाघोली, ता. जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती,उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हाग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, जिल्हा परिषद,उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. पंडित तात्या गायकवाड, | : | अपिलार्थी |
| | रा. खडकी, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, | | |
| | तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | | |
| | जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| | उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद | | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१६१२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर,<br>तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. एम. जे. मेटे,<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, तुळजापूर | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-०१-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. प्रतीवर दिनांक नाही |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २७-०६-२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थीला पोस्टाने माहिती पाठविण्यात आली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये सन २००५ ते २०१० या कालावधीतील मौजे खडकी ग्रामपंचायत येथील खालील योजनांची माहिती मागितली आहे.

१. बारावा वित्त आयोग.

२. दलित वस्ती सुधार योजना.

३. तांडा सुधार योजना.

४. आरोग्य केंद्र निधी.

५. यशवंत ग्रामसमृध्दी योजना

व इतर वेगवेगळया योजनावरील खालील माहिती त्यांना अपेक्षित दिसत आहे.

१. प्रतिवर्षी वेगवेगळया योजनांसाठी एकूण प्राप्त निधी.

२. प्रतिवर्षी कामाचा खर्च केलेल्या वेगवेगळया कामांची यादी व त्यावरील निधी.

३. पूर्ण झालेल्या कामांची संख्या.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थी मागितलेली माहिती मोघम स्वरुपात दिसत आहे.

या पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन तसे अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी लागेल व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## **आदेश**

जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००)

सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पंडित तात्या गायकवाड, रा. खडकी, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. संजय महादेवराव सोनवणे, : अपिलार्थी

रायगड, राजे संभाजी नगर, मोतीझरा विभाग, तुळजापूर,
तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,
उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :

अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद

१ अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१७०८

२ सुनावणीची तारीख दि. ०७-०३-२०१२

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी - श्री. संजय महादेवराव सोनवणे : उपस्थित

३.२ अपिलार्थी यांचे मदतनीस - श्री. नरसिंग जाधव : उपस्थित

३.३ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित

सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,
उस्मानाबाद - श्री. राजकुमार महादेव माने

३.४ जन अपिलीय अधिकारी तथा : अनुपस्थित

जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,
उस्मानाबाद

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख दि. १४-०२-२०११

५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख दि. ०१-०३-२०११

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १५-०४-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०७-०७-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी त्यांचे मदतनीस व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक १४-०२-२०११ च्या माहिती अर्जान्वये उप लोकआयुक्त यांच्या दिनांक ०१ ऑक्टोबर २०१० च्या पत्रानुसार जिल्हा पुरवठा अधिकारी, उस्मानाबाद यांनी दिनांक २७-०७-२०१० च्या पत्रानुसार उप लोकआयुक्त यांच्याकडे पाठविलेल्या अहवालाची छायांकीत प्रत मागितली आहे व यासंदर्भात इतर तीन मुद्दयावर माहिती मागितली आहे. सदरची माहिती ही वैयक्तीक स्वरुपाची असल्याने जन माहिती अधिकारी तथा सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, उस्मानाबाद यांनी अपिलार्थीस दिनांक ०१-०३-२०११ च्या पत्रानुसार समक्ष पाहणी करुन आवश्यक असलेल्या माहितीच्या प्रती व्यक्तिशः प्राप्त करुन घ्याव्यात असे कळविल्याचे दिसून येत आहे. त्यानुसार अपिलार्थी यांना पाहणी दिलेली आहे. तथापि अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती त्यामध्ये नाही.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थी यांना खालील माहिती अपेक्षित आहे असे दिसून येते आहे.

१. उप लोकआयुक्त यांच्या कार्यालयाच्या दिनांक ०१ ऑक्टोबर २०१० च्या पत्रानुसार जिल्हा पुरवठा अधिकारी, उस्मानबाद यांनी उप लोकआयुक्त यांना पाठविलेल्या अहवालासह पत्राची प्रत.

२. या अहवालामध्ये नमूद केले आहे की, सर्व तक्रारीचे निराकरण झाले आहे, त्यानुसार ज्या ज्या तक्रारी निकाली काढल्या आहेत त्या त्या नावांची यादी.

३. त्रयस्थ गॅस एजन्सी यांच्याविरुध्द ज्या तक्रारी आल्या त्या तक्रारदारांच्या नावाची यादी तसेच तक्रार निवारण झालेल्या तक्रारदारांच्या नावाची यादी.

४. तक्रार निवारण करतेवेळी निर्माण झालेल्या कागदपत्राच्या टिपणीच्या इत्यादीच्या प्रती.

वरील माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार देय होत आहे. त्याच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी नोंदणीकृत टपालाने अपिलार्थीस विनामूल्य पाठविण्याची व्यवस्था करावी. तसेच जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत स्पष्टपणे अपिलार्थीस कळवावे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## <u>आदेश</u>

जन माहिती अधिकारी तथा सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, उस्मानाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संजय महादेवराव सोनवणे, रायगड, राजे संभाजी नगर, मोतीझरा विभाग, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रामचंद्र सोपानराव आडसूळ, : अपिलार्थी
मु. पो. लांजेश्वर, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, भूम,
जिल्हा उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, भूम,
जिल्हा उस्मानाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१८१० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०७-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, भूम,<br>जिल्हा उस्मानाबाद - श्री. एन. एम. मुळे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, भूम,<br>जिल्हा उस्मानाबाद - श्री. एच. के. नाईकवाडी | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २५-०३-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १९-०४-२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०२-०५-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २४-०६-२०११ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १८-०७-२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी दिनांक २५-०३-२०११ च्या माहिती अर्जान्वये रोजगार हमी योजनेबाबत योजनेतून झालेल्या एकूण मातीनाला बांधकामाबाबतच्या अंदाजपत्रकाच्या प्रती, सर्व हजेरीपत्रकाच्या सत्यप्रती, कुपनाच्या सत्यप्रती इत्यादी अशी विस्तृत माहिती दिनांक ०१ जून २००० ते ०७ जून २००७ पर्यंत मागितली आहे. माहिती पुरविण्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी १२९७६ इतक्या पृष्ठांकरिता रुपये २५९५२ इतक्या शुल्काचा भरणा करावा असे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत दिनांक १९-०४-२०११ रोजी कळविले आहे. अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, भूम यांच्याकडे सुनावणी झाली. त्यामध्ये या बाबींची नोंद करण्यात आली आहे व अपिलार्थी यांनी १५ दिवसाच्या आत शुल्काचा भरणा करावा म्हणजे जन माहिती अधिकारी माहिती देऊ शकतील असा निर्णय घेऊन प्रकरण निकाली काढले आहे. त्यावर अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिला नाही.

वरील सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रामचंद्र सोपानराव आडसूळ, मु. पो. लांजेश्वर, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद.

२.	जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, भूम, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, भूम, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. लक्ष्मीकांत वामनराव खटके,<br>रा. नांदुर्गा, तालुका जिल्हा उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>जलस्वराज्य विभाग, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, नांदुर्गा, तालुका जिल्हा उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती कार्यालय, उस्मानाबाद, तालुका जिल्हा उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१८६४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. लक्ष्मीकांत वामनराव खटके | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, नांदुर्गा, तालुका जिल्हा उस्मानाबाद - श्री. शिंगाडे एम. ए. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती कार्यालय, उस्मानाबाद - श्री. बी. टी. जाधव | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०९-०९-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०५-१०-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २३-०३-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २९-०३-२०११ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २१-०७-२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहितीकरिता रुपये ३२२० इतक्या शुल्काचा भरणा करावा असे दिनांक ०५-१०-२०१० रोजी विहित मुदतीत कळविले आहे. अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा केलेला आहे. त्यांना माहिती पाठविली आहे. तथापि अपिलार्थी यांनी पोच दिलेली नाही.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांना शुल्काचा भरणा करुनही आतापर्यंत माहिती मिळालेली नाही.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रे या सर्व बाबींचा विचार करता या प्रकरणात जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती कार्यालय, उस्मानाबाद यांनी अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीपैकी जी माहिती कार्यालयात उपलब्ध आहे ती जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत नोंदणीकृत टपालाने पाठवावी. आतापर्यंत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिली नसल्यामुळे शुल्कापोटी भरलेल्या रुपये ३२२० चा डी. डी. अपिलार्थीस परत करण्यात यावा. या बाबी जन माहिती अधिकारी करतील याची खातरजमा जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती कार्यालय, उस्मानाबाद यांनी करावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती कार्यालय, उस्मानाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी हे आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत कार्यवाही करतील ही बाब पहावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. लक्ष्मीकांत वामनराव खटके, रा. नांदुर्गा, तालुका जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, नांदुर्गा, तालुका जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती कार्यालय, उस्मानाबाद, तालुका जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. विश्वेकर मेघराज बबन, | : | अपिलार्थी |
| रा. झिन्नर, पो. दसनेगांव, तालुका वाशी, जिल्हा उस्मानाबाद | | |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| मुख्याध्यापक, महात्मा बसवेश्वर विद्यालय, दसनेगांव (झिन्नर), तालुका वाशी, जिल्हा उस्मानाबाद | | |
| जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१९२७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. विश्वेकर मेघराज बबन | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, महात्मा बसवेश्वर विद्यालय, दसनेगांव (झिन्नर), तालुका वाशी, जिल्हा उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. कांबळे एम. के., कक्ष अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १७-०२-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०६-०७-२०११ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०८-०४-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८-०६-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९-०७-२०११<br>फेरसादर दिनांक<br>२३-११-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांनी मागितलेली माहिती मिळाली आहे. तथापि जी अपूर्ण आहे ती देण्यात यावी. यामध्ये त्यांना लेखा परिक्षणाच्या सत्यप्रती मिळालेल्या नाहीत. त्याकरिता ते नेमके वर्ष सांगू शकले नाहीत. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये खालील माहिती मागितली आहे असे आढळून येत आहे.

शाळा मान्यता मिळाल्यापासून मुख्याध्यापक, सहशिक्षक, लिपीक, सेवक यांना शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडे पाठविण्यात आलेल्या संपूर्ण प्रस्तावाच्या सत्यप्रती, वैयक्तीक मान्यता प्रती, प्रोसिडींग बुकाच्या सत्यप्रती, अनुशेष तक्ता, रोस्टरच्या सत्यप्रती, संस्थेच्या ठरावाच्या सत्यप्रती, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या हजेरीपत्रकाच्या सत्यप्रती (१९९९-२००० ते २०१०-११) या कालावधीतील लेखा परिक्षणाच्या सत्यप्रती.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व अपिलार्थीचा अर्ज विचारात घेता अपिलार्थीने फार मोठ्या कालावधीची व विविध मुद्दयांवर विस्तृत अशी माहिती मागितली असल्याचे दिसून येत आहे. ही माहिती एकत्र करण्यास जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाची साधनसामग्री व मनुष्यबळ मोठ्या प्रमाणावर वळवावे लागणार आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार ही बाब अपेक्षित नाही. माहिती अधिकार अधिनियमतील भूमिकेशी सुसंगत दृष्टीकोनातून माहितीची मागणी करणे अपेक्षित आहे. अपिलार्थी यांनी अशा प्रकारची मोघम, विस्तृत व व्यापक स्वरुपाची माहिती मागितली असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील उद्दिष्टे सफल होत नाहीत व अर्ज अव्यवहार्य ठरुन त्याचे गांभीर्य नष्ट होते असे आयोगाचे मत आहे व अशा माहिती अर्जांवर विचार करता येणार नाही असे निर्णय प्रसंगी घेण्यात आलेले आहेत.

जी माहिती उपलब्ध आहे ती अपिलार्थीस देण्यात आली आहे. तथापि जी माहिती उपलब्ध नाही ती देण्यात आली नाही. या सर्व बाबी विचारात घेता आयोगाच्या स्तरावर प्रकरण बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विश्वेकर मेघराज बबन, रा. झिन्नर, पो. दसनेगांव, तालुका वाशी, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, महात्मा बसवेश्वर विद्यालय, दसनेगांव (झिन्नर), तालुका वाशी, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कुटे बालाजी भिमराव, : अपिलार्थी
मु. पो. सोनगिरी, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, सोनगिरी, तालुका भूम,
जिल्हा उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, भूम,
तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद

१ अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१९५१

२ सुनावणीची तारीख दि. ०७-०३-२०१२

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी - श्री. कुटे बालाजी भिमराव : उपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, सोनगिरी, तालुका भूम,
जिल्हा उस्मानाबाद - श्री. एन. डी. श्रीगीरे

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित
विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, भूम,
तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद - श्री. व्हि. जे. वाघमारे

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख दि. ०६-०४-२०११

५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख --

६ प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १४-०६-२०११

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख दि. ०७-०७-२०११

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०२-०८-२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक ०६-०४-२०११ च्या माहिती अर्जान्वये दिनांक ०१ जून २००९ ते ३१ मार्च २०११ अशी दोन वर्षाची ग्रामपंचायत सोनगिरी, तालुका भूम अंर्तगत विविध कामाबाबत विस्तृत अशी माहिती मागितली आहे. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार होते. माहितीची व्याप्ती विचारात घेता माहिती संकलीत करण्यास जन माहिती अधिकारी यांना जास्त कालावधी लागला आहे. माहितीच्या व्याप्तीवरुन हा विलंब लागलेला दिसत आहे. त्याचप्रमाणे याच कालावधीत त्यांचे ऑपरेशन झाले आहे असे कारण त्यांनी कथन केले आहे. आज रोजी ११० पृष्ठांची माहिती अपिलार्थीस देण्यात आली. अपिलार्थी यांनी ती स्विकारली. अपिलार्थी यांनी या माहितीची पाहणी करावी व अपिलार्थी यांनी नेमकी कोणती माहिती अपूर्ण मिळाली आहे ही बाब जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसाच्या आत कळवावी व पुढील पंधरा दिवसात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ माहिती अर्जासंदर्भात उर्वरीत माहिती अपिलार्थीस द्यावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, सोनगिरी, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने कळविल्यास उर्वरीत माहिती अपिलार्थीस पुढील पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कुटे बालाजी भिमराव, मु. पो. सोनगिरी, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, सोनगिरी, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, भूम, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. भिमराव काशीनाथ गायकवाड,<br>मु. पो. भिमनगर, भूम, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, पाटबंधारे उपविभाग, भूम,<br>मुख्यालय कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप अभियंता, पाटबंधारे सिंचन उपविभाग, कळंब,<br>तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२००५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>शाखाधिकारी, बाणगंगा जलसिंचन शाखा, ईट, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद - श्री. एस. आर. सासवडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, पाटबंधारे उपविभाग, कळंब, जिल्हा उस्मानाबाद - श्री. सी. डी. लोमटे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०६-०४-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २९-०४-२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २७-०६-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १०-०८-२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी दिनांक ०५-०४-२०११ च्या माहिती अर्जान्वये ०१ जून २००६ ते अर्ज करण्याच्या दिनांकापर्यंत या पाच वर्षाच्या कालावधीतील गोदावरी खोरे अंतर्गत येणारे मध्यम प्रकल्प यावरील पाणी वाटपाबाबत विविध मुद्दयावर माहिती मागितली आहे. सदरची माहिती अपिलार्थीस दिनांक १८-०७-२०११ रोजी शाखाधिकारी, बाणगंगा जलसिंचन शाखा, भूम, मुख्यालय ईट यांनी नोंदणीकृत टपालाने पाठविली आहे. अपिलार्थीस ती प्राप्त झाली आहे. त्याची पोच जन माहिती अधिकारी यांच्या दप्तर दाखल आहे. उर्वरीत माहिती शाखा परंडा यांच्याकडे होती ती अपिलार्थीस देण्यात आली आहे त्याची पोच दिली आहे. माहितीची व्याप्ती व मोठ्या कालावधीमुळे माहिती देण्यास विलंब झाला आहे हे कारण पुरेसे दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. भिमराव काशीनाथ गायकवाड, मु. पो. भिमनगर, भूम, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा शाखाधिकारी, बाणगंगा जलसिंचन शाखा, ईट, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, पाटबंधारे उपविभाग, कळंब,

तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. तानाजी देवाप्पा कदम,<br>रा. हडको, तुळजापूर, तालुका तुळजापूर,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), प्रा. शाखा-२, जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : | |

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२०१८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०७-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. के. आर. शेवरे, कक्ष अधिकारी | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०४-०६-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०६-०७-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १२-०८-२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. सुनावणीच्या वेळी त्यांनी आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक ०२-०६-२०११ रोजीच्या माहितीच्या अर्जाव्दारे रामवरदायनी प्राथमिक विद्यामंदिर, तुळजापूरबाबत जून २००९ ते ०१ एप्रिल २०११ या कालावधीशी संबंधित एकूण आठ मुद्दयांव्दारे माहिती मागितली आहे. यासंदर्भात दिनांक ०२-०७-२०११ रोजीच्या पत्राव्दारे मुद्दा क्रमांक १ व २ ची माहिती दिली आहे. मुद्दा क्रमांक ४ व ६ शी संबंधित माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याने ती संबंधित प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापकाकडून घेण्याचे कळविले आहे. तसेच उर्वरित माहितीसंदर्भात चौकशीची प्रक्रिया सुरु असल्याने माहिती देता आली नाही. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिला आहे की, चौकशी झाल्यानंतर अहवाल प्राप्त होताच माहिती देण्यात यावी. त्यानुसार दिनांक ०५-०८-२०११ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस माहिती देण्यात आली आहे.

आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रावरुन वरील बाबी दिसून येत आहेत.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. तानाजी देवाप्पा कदम, रा. हडको, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. चौधरी मोहमद मोईनोद्दीन गौस मनियार,<br>रा. नेहरु चौक, उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>नगर परिषद, उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२०२२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कनिष्ठ अभियंता, नगर परिषद, उस्मानाबाद<br>- श्री. लोंढे पी. डी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१-०४-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०५-०५-२०११ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२-०५-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २४-०६-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२-०८-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये उस्मानाबाद शहरातील एकूण ओपन स्पेस किती आहे त्याच्या क्षेत्रफळाची माहिती व इतर खुल्या जागा याबाबतची माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. माहितीचा कालावधी सन १९८० ते मार्च २०११ असा नमूद केला आहे. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार होते. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जावर प्रथम प्रतिसाद दिनांक ०५-०५-२०११ रोजी जन माहिती अधिकारी तथा उप अवेक्षक, (नगर रचना विभाग), नगर परिषद, उस्मानाबाद यांनी दिल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले त्यावर जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, उस्मानाबाद यांनी दिनांक २४-०६-२०११ रोजी निर्णय देताना नमूद केले आहे की, " जन माहिती अधिकारी श्री. व्ही. जे. थेटे कर आकारणी बांधकाम इ. विभाग प्रमुख न. प. उस्मानाबाद यांनी अपिलार्थी यांचा अर्ज दिनांक २१-०४-२०११ चे अर्जातील मुद्दा क्रमांक १ ते ५ ची माहिती पुरविली आहे. मात्र अपिलार्थीचे समाधान न झाल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी त्याचे अभिलेखाची पाहणी करुन अभिलेखावर मुद्दा क्र. १, २, ३ ची माहिती उपलब्ध असल्यास अपिलार्थीस सात दिवसाच्या आत पुरविण्यात यावी. सदर माहिती स्वतःच्या खर्चाने पुरविण्यात यावी माहिती पुरविण्यासाठी कार्यालयीन खर्च करण्यात येऊ नये."

अपिलार्थी यांचे दिनांक ०८-०८-२०११ चे व्दितीय अपील आयोगासमोर आहे. त्यात त्यांना माहिती मिळाल्याचे आढळून येत आहे. तथापि त्यात त्यांनी चुकीची व अपूर्ण माहिती मिळाल्याचे नमूद केले आहे.

आज रोजी दिनांक ०७-०३-२०१२ रोजीच्या पत्रान्वये उर्वरित माहिती पाठविल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास कथन केले. या पार्श्वभूमीवर अपिलार्थी यांनी माहिती अपूर्ण म्हणजे कोणती माहिती अपूर्ण मिळाली आहे ही बाब जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसाच्या आत कळवावी व पुढील पंधरा दिवसात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ माहिती अर्जासंदर्भात उर्वरित माहिती अपिलार्थीस द्यावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, नगरपरिषद, उस्मानाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने कळविल्यास उर्वरित माहिती अपिलार्थीस पुढील पंधरा दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. चौधरी मोहमद मोईनोद्दीन गौस मनियार, रा. नेहरु चौक, उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, नगर परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. उल्हास फुलचंद राठोड,<br>मु. पो. घाटंग्री तांडा न. १, तालुका जिल्हा उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, लिटल स्टार प्राथमिक शाळा, पोलीस लाईन, उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२०२८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. उल्हास फुलचंद राठोड | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, लिटल स्टार प्राथमिक शाळा, पोलीस लाईन, उस्मानाबाद - श्री. भांगे दिपक मारुती | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. के. आर. शेवरे, कक्ष अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-०५-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १३-०६-२०११ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८-०६-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १९-०७-२०११ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १६-०८-२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांना मुद्दा क्रमांक ४ ची माहिती प्राप्त झाली नाही व मुद्दा क्रमांक ३ ची माहिती अर्धवट मिळाली आहे. बाकी इतर त्यांनी मागितलेल्या मुद्दयावरील माहिती मिळाली आहे. शाळेसंबंधी होती ती माहिती मिळाली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, सन १९९७ पासून शाळा कार्यरत आहे व जी माहिती उपलब्ध आहे ती देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जामध्ये खालील बाबींची माहिती मागितल्याचे दिसून येत आहे.

१. शाळा मान्यता पत्र, शाळेची खाते मान्यता प्रत, वर्ग मान्यता व अनुदान मान्यतेच्या प्रती.

२. दर वर्षीच्या शालेय समितीचे प्रोसिडींग बुकाची सत्यप्रत.

३. संस्थेमार्फत नेमण्यात आलेल्या बालवाडी व प्राथमिक शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका व इतर कर्मचारी यांचे शैक्षणिक वर्षेनिहाय नेमणूक आदेशाच्या सत्यप्रती स्थापनेपासून जून २०१० पर्यंत.

४. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचे मंजूर रोस्टर रजिस्टर.

५. शाळेचे तपासणी अहवाल स्थापनेपासून २०११ पर्यंत.

६. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचे संस्थेमार्फत अदा केलेले मानधन / पगार मार्च २०११ पर्यंत.

७. नियुक्त सर्व कर्मचा-यांचे शैक्षणिक व व्यवसायीक प्रमाणपत्र सन जून १९९४ ते जून २००८ पर्यंत.

८. सन जून १९९४ ते डिसेंबर २०१० पर्यंत शाळेची वर्षनिहाय व वर्गनिहाय विद्यार्थी संख्या.

९. शाळा स्थापनेपासून ते शैक्षणिक वर्षे २०१०-११ पर्यंत वर्षेनिहाय संच मान्यता प्रती.

१०. संस्थेने दिलेल्या नेमणूक आदेशाच्या व जि. प. शिक्षण विभागाने दिलेल्या सर्व कायम कर्मचा-यांच्या वैयक्तीक मान्यतेच्या प्रती.

११. शाळेतील कर्मचा-यांसाठी दिलेल्या दैनंदिन सूचना रजिस्टरच्या सत्यप्रती, शाळा स्थापनेपासून आतापर्यंतच्या.

१२.  शासकीय अधिकारी व संस्थेचे पदाधिकारी यांनी शाळेला भेट दिल्यावेळी नोंदविलेल्या शेरे बुकाच्या साक्षांकीत प्रती शाळा स्थापनेपासून आजपर्यंत.

१३.  शाळा अंतर्गत घेतल्या जाणा-या स्पर्धा व इतर उपक्रम यांच्या नोंदी व त्या उपक्रमातील बक्षीस पात्र विद्यार्थ्यांची शाळा स्थापनेपासून ते आजपर्यंतच्या सत्यप्रती.

१४.  जवाहर नवोदय प्रवेश परीक्षा व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा यामध्ये गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांची यादी शाळा स्थापनेपासून ते आजपर्यंत.

१५.  सदरील शाळा ज्या संस्थेमार्फत चालविली जाते त्या संस्थेचे शाळा स्थापनेपासूनचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सचिव यांचे पूर्ण नाव, त्यांचा कालावधी देण्यात यावा.

माहिती मागण्याचा कालावधी हा शाळा स्थापनेपासून ते मार्च २०११ पर्यंत असा आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व अपिलार्थीचा अर्ज विचारात घेता अपिलार्थीने फार मोठ्या कालावधीची व विविध मुद्दयांवर विस्तृत अशी माहिती मागितली असल्याचे दिसून येत आहे. ही माहिती एकत्र करण्यास जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाची साधनसामग्री व मनुष्यबळ मोठ्या प्रमाणावर वळवावे लागणार आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार ही बाब अपेक्षित नाही. माहिती अधिकार अधिनियमतील भूमिकेशी सुसंगत दृष्टीकोनातून माहितीची मागणी करणे अपेक्षित आहे. अपिलार्थी यांनी अशा प्रकारची मोघम, विस्तृत व व्यापक स्वरुपाची माहिती मागितली असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील उद्दिष्टे सफल होत नाहीत व अर्ज अव्यवहार्य ठरुन त्याचे गांभीर्य नष्ट होते असे आयोगाचे मत आहे व अशा माहिती अर्जांवर विचार करता येणार नाही असे निर्णय प्रसंगी घेण्यात आलेले आहेत.

अपिलार्थीस मुद्दा क्रमांक ४ ची पूर्ण माहिती मिळाली नाही व मुद्दा क्रमांक ३ ची अपूर्ण मिळाली आहे. आज रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे जी माहिती उपलब्ध आहे ती नोंदणीकृत टपालाने अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्याआत विनामूल्य पाठविण्यात यावी. या टप्प्यावर प्रकरण बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, लिटल स्टार प्राथमिक शाळा, उस्मानाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक  ०७-०३-२०१२**

---------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. उल्हास फुलचंद राठोड, मु. पो. घाटंग्री तांडा न. १, तालुका जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, लिटल स्टार प्राथमिक शाळा, पोलीस लाईन, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. गोपाळराव अंबादासराव बोरीकर, रा.परभणी | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, परभणी | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पोलीस अधीक्षक, परभणी | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२८०९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय पोलीस अधिकारी, परभणी शहर-श्री. संदीप राजाराम डोईफोडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा पोलीस अधीक्षक, परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २९.०८.२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०१.१०.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०२.११.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.११.२०११ |

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दि. ०१.०२.२०१२ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नव्हते. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटल्यामुळे आयोगातर्फे सदर प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख दि. ०७.०३.२०१२ अशी निश्चित करण्यात आली

होती.आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांचा दि. २९.०८.२०११ रोजीचा माहितीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे दि. ०२.०९.२०११ रोजी जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून प्राप्त झाला. या माहिती अर्जासंदर्भात संबंधित पोलीस स्टेशनकडून माहिती प्राप्त करुन घेण्यात आली व अपिलार्थीस खास दुतामार्फत कार्यालयाचे पत्र क्र. जा.क्र.२१७३/११, दि. ३०.०९.२०११ रोजी अधिनियमातील कलम ७(१) नुसार विहित मुदतीत पाठविण्यात आली. अपिलार्थी यांनी ती स्वीकृत केली नाही. याबाबतची नोंद पोलीस स्टेशन डायरीत आहे. प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. ०२.११.२०११ रोजी निर्णय दिला आहे. या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित होते व माहितीचा एक संच नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानंतर नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती पाठविली आहे.

अपिलार्थी मागील सुनावणीच्या वेळी अनुपस्थित होते. त्यांची बाजू ऐकून घेण्याकरिता आयोगातर्फे सुनावणीची पुढील तारीख देण्यात आली होती. आज रोजीही अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती पाठविल्याचे दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गोपाळराव अंबादासराव बोरीकर,सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी, रा.शिवाजीनगर,

परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,परभणी शहर, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पोलीस अधिक्षक, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कैलास विठ्ठलराव अक्कर, : अपिलार्थी
संपादक, सा. सह्याद्रीचा आवाज कार्यालय, पांडव निवास,
दत्त मंदिराजवळ, टिळकनगर, सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, सिल्लोड,
जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी
कार्यालय, सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२३२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, सिल्लोड,<br>जिल्हा औरंगाबाद - श्री. अरुण जोशी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, सिल्लोड,<br>जिल्हा औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१-०९-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-११-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २८-०१-२०११

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक ०२-०२-२०१२ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित होते. त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात आली होती.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक १६-११-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक १६-११-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

--------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कैलास विठ्ठलराव अक्कर, संपादक, सा. सह्याद्रीचा आवाज कार्यालय, पांडव निवास, दत्त मंदिराजवळ, टिळकनगर, सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. लक्ष्मीकांत मनोहर कापसीकर,<br>यश इंजिनिअर्स, लक्ष्मी निवास, ७३, जयविश्वभारती कॉलनी, औरंगाबाद - ४३१ ००५ | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उप अधीक्षक अभियंता, यवतमाळ पाटबंधारे मंडळ, यवतमाळ | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता, यवतमाळ पाटबंधारे मंडळ, यवतमाळ | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२६० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. लक्ष्मीकांत मनोहर कापसीकर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप अधीक्षक अभियंता, यवतमाळ पाटबंधारे मंडळ, यवतमाळ - श्री. रा. अ. काटपल्लीवार | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता, यवतमाळ पाटबंधारे मंडळ, यवतमाळ | : | अनुपस्थित |
| ३.५ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. मो. मा. नरवाडे, अधीक्षक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-०९-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १३-१०-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-१०-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०८-१२-२०१० |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०३-०१-२०११ (अमरावती कार्यालयाकडे प्राप्त) दि.०१-०२-२०११ (औरंगाबाद कार्यालयाकडे प्राप्त) |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक ०२-०२-२०१२ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून आले होते की, अपिलार्थी यांनी दिनांक १२-०९-२०१० च्या माहिती अर्जान्वये एकूण दोन मुद्दयावर यवतमाळ जिल्ह्यातील निम्न पैनगंगा प्रकल्पाच्या अनुषंगाने चालू असलेल्या कामांची माहिती मागितली होती. ही माहिती अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (१) (झ) अन्वये नाकारण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले होते की, मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती यांच्याकडे अशाच प्रकारची माहिती मागितली असता ती त्यांना देण्यात आली आहे. त्यावेळी जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, यवतमाळ पाटबंधारे मंडळ, यवतमाळ अनुपस्थित होते. त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटल्याने आयोगास दिलेल्या अधिकारानुसार त्यांची विशेष साक्ष ठेवण्यात आली होती व प्रकरणात सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात आली होती.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, यवतमाळ पाटबंधारे मंडळ, यवतमाळ यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते यास्तव सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## <u>अंतरिम आदेश</u>

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक २६-०४-२०१२ रोजी सकाळी ११-३० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. लक्ष्मीकांत मनोहर कापसीकर, यश इंजिनिअर्स, लक्ष्मी निवास, ७३ जयविश्वभारती कॉलनी, औरंगाबाद - ४३१ ००५.

२. जन माहिती अधिकारी तथा उप अधीक्षक अभियंता, यवतमाळ पाटबंधारे मंडळ, यवतमाळ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, यवतमाळ पाटबंधारे मंडळ, यवतमाळ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. बनसोडे श्रीपाल चंद्रपाल,<br>भिमनगर, क्रांती चौक, उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>विभाग प्रमुख, नगर परिषद, उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, उस्मानाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/०५७१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. | १३-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नाकेदार, वसुली विभाग प्रमुख, नगर परिषद, उस्मानाबाद<br>- श्री. शर्मा गुरुप्रसाद मदनलाल | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०७-०९-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १२-१०-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | २३-११-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २९-१२-२०१०<br>फेरसादर दिनांक<br>०४-०३-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी नगरपरिषदेने शहरात बांधलेल्या एकूण गाळ्यासंबंधी माहिती मागितली आहे. जी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहे ती अपिलार्थीस दिनांक ०६-१०-२०१० रोजी देण्यात आली आहे. सदरच्या माहितीपोटी रुपये ८४ इतक्या शुल्काचा भरणा अपिलार्थी यांनी केल्यानंतर अपिलार्थीस माहिती देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी माहितीमध्ये मुदत संपलेल्या गाळेधारकाची यादी मागितली आहे. ज्या प्रकारे माहिती उपलब्ध आहे त्या प्रकारे ती अपिलार्थीस देण्यात आली होती. तथापि यासंदर्भात विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांच्या पत्राची प्रत,यादी तसेच शासन निर्णयाची प्रत (३२ पृष्ठे) जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करून घेतली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी वस्तुस्थितीवर आधारित माहिती मागितली आहे, असे दिसून येत आहे. तथापि माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये ज्या प्रकारे माहिती उपलब्ध आहे तशी देणे आवश्यक आहे. माहिती संस्करण करुन देय होत नाही. या सर्व बाबी विचारात घेता जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली ३२ पृष्ठांची माहिती अपिलार्थीस विनामूल्य नोंदणीकृत टपालाव्दारे पाठवावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बनसोडे श्रीपाल चंद्रपाल, भिमनगर, क्रांती चौक, उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा नाकेदार, वसुली विभाग प्रमुख, नगर परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुनिल हणमंत घाडगे, : अपिलार्थी
समाजसेवक अण्णा हजारे प्रणित भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यास सदस्य, वेताळनगर, तुळजापूर,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, सुरतगांव,
तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी (वर्ग-१), पंचायत समिती, तुळजापूर,
जिल्हा उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/०५८४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सुनिल हणमंत घाडगे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, सुरतगांव,<br>तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद<br>- श्रीमती मोरे एस. एच. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी (वर्ग-१), पंचायत समिती, तुळजापूर,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. राऊत एस. एस. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती तुळज़ापूर | : | उपस्थित |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | २९-१०-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १४-१२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०७-०३-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक १४-१२-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरणात गट विकास अधिकारी (वर्ग-१), पंचायत समिती, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना जन अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करावा.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी (वर्ग-१), पंचायत समिती, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक १४-१२-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १३-०३-२०१२**

----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुनिल हणमंत घाडगे, समाजसेवक अण्णा हजारे प्रणित भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यास सदस्य, वेताळनगर, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, सुरतगांव, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी (वर्ग-१), पंचायत समिती, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मुलानी आलम मकबुल, : अपिलार्थी
सह शिक्षक, लोकसेवा हायस्कुल, गिरवली, तालुका भूम,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सचिव, लोकसेवा शिक्षण प्रसारक मंडळ, भूम,
तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
अध्यक्ष, लोकसेवा शिक्षण प्रसारक मंडळ, भूम,
तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद

१ अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/०५८७
२ सुनावणीची तारीख दि. १३-०३-२०१२
३ आज रोजीची उपस्थिती
३.१ अपिलार्थी - श्री. मुलानी आलम मकबुल : उपस्थित
३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
सचिव, लोकसेवा शिक्षण प्रसारक मंडळ, भूम,
तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद
- श्री. सुदाम महादेवराव मस्कर
३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित
अध्यक्ष, लोकसेवा शिक्षण प्रसारक मंडळ, भूम,
तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद - श्री. कंकर सर्जेराव मोटे

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख दि. १२-०१-२०११
५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख --

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २५-०१-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२-०२-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०७-०३-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीच्या प्रती त्यांना मिळालेल्या आहेत. तथापि अपिलार्थी यांना प्राप्त झालेल्या माहितीवरून त्यांच्या सेवाजेष्ठतेबाबत अन्याय झाला आहे असे त्यांना आढळून येत आहे. ही वेगळी प्रशासकीय बाब आहे याकरिता त्यांना वेगळा अर्ज स्वतंत्रपणे सक्षम प्राधिका-याकडे करावा लागेल असे आयोगाचे मत आहे. सर्वांनी ही बाब मान्य केली.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०३-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मुलानी आलम मकबुल, सह शिक्षक, लोकसेवा हायस्कुल, गिरवली, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा सचिव, लोकसेवा शिक्षण प्रसारक मंडळ, भूम, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, लोकसेवा शिक्षण प्रसारक मंडळ, भूम, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. लक्ष्मण तुकाराम वारे,<br>माजी सरपंच, मु. ब-हाणपूर, पो. उळूप, तालुका भूम,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, ब-हाणपूर, तालुका भूम,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती कार्यालय,<br>भूम, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/०५९६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. लक्ष्मण तुकाराम वारे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, ब-हाणपूर, तालुका भूम,<br>जिल्हा उस्मानाबाद - श्री. एस. जी. गायकवाड | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती कार्यालय,<br>भूम, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद - श्री. आर. डी. मगर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०२-११-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-०१-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०२-०२-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७-०३-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीपैकी जी माहिती उपलब्ध होती ती दिनांक ०२-१२-२०१० रोजी अपिलार्थीस दिलेली आहे. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार होते.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांना माहितीच्या प्रमाणित प्रती मिळाल्या नाहीत, छायांकीत प्रती मिळाल्या आहेत. तसेच त्यांना माहिती उशीराने म्हणजे प्रथम अपील सुनावणीनतंर प्राप्त झाली आहे व या माहितीमध्ये त्यांना मासिक बैठकीच्या प्रती मिळालेल्या नाहीत.

आज रोजी मासिक बैठकीच्या प्रती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहेत. त्या अपिलार्थीस देण्यात आल्या. अपिलार्थी यांनी त्या स्विकारल्या. अपिलार्थी यांनी पुढे कथन केले की, त्यांनी सरपंच पदावर असताना सौर उर्जेसंदर्भात कामे केली आहेत. त्यावर झालेल्या खर्चापोटी त्यांना चार लाख रुपये मिळाले आहेत व उर्वरीत रुपये ८६००० प्राप्त झाले नाहीत. परंतु त्याचे देयक काढण्यात आल्याचे त्यांना समजते. ही प्रशासकीय बाब आहे. यावर अपिलार्थी यांनी आयोगास अवगत केले की, याबाबत त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकार यांच्याकडे तक्रार केली असून याबाबतची चौकशी प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचे या बाबीकडे लक्ष वेधण्यात येत आहे. त्यांनी याबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १३-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. लक्ष्मण तुकाराम वारे, माजी सरपंच, मु. ब-हाणपूर, पो. उळूप, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, ब-हाणपूर, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती कार्यालय, भूम, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. फुलचंद चंदु राठोड,<br>मु. पो. घाटंग्री तांडा नं.-१, तालुका जिल्हा उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२०२९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. फुलचंद चंदु राठोड | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. टी. डी. गवळी, व. स. शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-०३-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २०-०४-२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १५-०६-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १९-०७-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-०८-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांनी मागितलेली माहिती त्यांना मिळाली आहे तथापि त्यामध्ये १९९८-९९ या शैक्षणिक वर्षाच्या दाखल केलेल्या संच मान्यतेच्या प्रस्तावाची प्रत त्यांना मिळाली नाही. यासंदर्भात दिनांक २६-०७-२०११ रोजी मुख्याध्यापक, लिटल स्टार प्राथमिक शाळा, उस्मानाबाद यांनी अपिलार्थीस सदरची प्रत उपलब्ध नाही असे कळविल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना अर्ज केलेला आहे. यास्तव जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्या कार्यालयात सन १९९८-९९ या शैक्षणिक वर्षाच्या दाखल केलेल्या संच मान्यतेच्या प्रस्तावाच्या संचिकेचा शोध घ्यावा व अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन द्यावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०३-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. फुलचंद चंदु राठोड, मु. पो. घाटंग्री तांडा नं.-१, तालुका जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. श्रीकांत अंबादास महाजन,<br>घर नंबर ७/७२७, कुलश्री, नगरपरिषद शाळेसमोर,<br>समतानगर, उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>कर आकारणी बांधकाम परवाना विभाग, विभाग प्रमुख,<br>नगर परिषद, उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, उस्मानाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२१७३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कनिष्ठ अभियंता, कर आकारणी बांधकाम परवाना विभाग,<br>विभाग प्रमुख, नगर परिषद, उस्मानाबाद - श्री. लोंढे पी. डी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१-०२-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २९-०३-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १६-०५-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७-०९-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आयोगास आवश्यक वाटते. म्हणून सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक १९-०४-२०१२ रोजी सकाळी ११-३० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. श्रीकांत अंबादास महाजन, घर नंबर ७/७२७, कुलश्री, नगरपरिषद शाळेसमोर, समतानगर, उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, कर आकारणी बांधकाम परवाना विभाग, विभाग प्रमुख, नगर परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राजाभाऊ उर्फ राजेंद्र दिगंबर माने, : अपिलार्थी
प्रदेश उपाध्यक्ष, भ्रष्टाचार निर्मुलन अभियान, तुळजापूर,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
वन परिक्षेत्र अधिकारी, वन परिक्षेत्र कार्यालय, तुळजापूर,
तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
उप विभागीय वन अधिकारी, उप वन अधिकारी कार्यालय,
उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२१७६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. राजाभाऊ उर्फ राजेंद्र दिगंबर माने | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>वन परिक्षेत्र अधिकारी, वन परिक्षेत्र कार्यालय, तुळजापूर,<br>तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद - श्री. ए. जी. पाटील | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय वन अधिकारी, उप वन अधिकारी कार्यालय,<br>उस्मानाबाद - श्री. एस. एम. पोतुलवार | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-०५-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७-०७-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०६-०९-२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले. तसेच त्यांचे लेखी म्हणणे सादर केले ते पाहण्यात आले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी सन २००३ ते २००५ या कालावधीतील संपूर्ण तालुक्यातील मजुरांच्या हजेरीपत्रक नकलांच्या सत्यप्रती, त्याचप्रमाणे या कालावधीत तालुक्यात किती व कोणत्या मजुरांना गहू, तांदुळ कुपन व रोख रक्कम दिली त्याचा संपूर्ण तपशील, वाटप रजिस्टर सत्यप्रती नोंदणीकृत टपालाव्दारे मागितल्या आहेत. माहितीचा कालावधी दोन वर्षाचा आहे. सदरच्या कालावधीमधील सुमारे १५०० हजेरीपत्रके असतील असे सध्याचे जन माहिती अधिकारी यांनी कथन केले आहे. जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, तुळजापूर यांनी माहितीची व्याप्ती विचारात घेता सदरची माहिती देण्यासाठी अनुदान उपलब्ध नसल्याने तसेच पुरेसे मनुष्यबळ नसल्याने माहितीची प्रत्यक्षात पाहणी करावी असे दिनांक ३१-०५-२०११ रोजी कळविले आहे असे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील सादर केले आहे. त्यामध्ये माहिती देण्यास जाणुनबुजून टाळाटाळ करणे, माहिती अधिकाराचे उल्लंघन करणे म्हणून दंडात्मक कार्यवाही करणे ही कारणे नमूद केली आहेत. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली असून जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांचा माहितीची पाहणी देण्याचा निर्णय कायम केला आहे व अपिलार्थी यांना कार्यालयात जाऊन प्रत्यक्ष माहितीची पाहणी करण्यासाठी वेळ निश्चित करण्याची संधी अपिलार्थीस देण्यात आली आहे. तथापि अद्यापपर्यंत अपिलार्थीने माहितीची पाहणी केल्याचे दिसून येत नाही.

अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज व व्दितीय अपील, मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती, जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत दिलेला प्रतिसाद तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी घेतलेला निर्णय, या सर्व बाबी विचारात घेता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन तसे अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे विनामूल्य छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजाभाऊ उर्फ राजेंद्र दिगंबर माने, प्रदेश उपाध्यक्ष, भ्रष्टाचार निर्मुलन अभियान, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, वन परिक्षेत्र कार्यालय, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय वन अधिकारी, उप वन अधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. मुनावर शहाबुद्दीन नबी रसूल,<br>मु. पो. वाघोली, तालुका जिल्हा उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२१८० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मुनावर शहाबुद्दीन नबी रसूल | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. टी. डी. गवळी, व. स., शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-०६-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५-०७-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २१-०७-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६-०९-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांनी २००६ ते अर्ज करण्याच्या दिनांकापर्यंतची संपूर्ण उस्मानाबाद जिल्ह्यातील सर्व अनुदानित व विनाअनुदानित प्राथमिक मराठी व उर्दु माध्यमाच्या शाळांची माहिती मागितली आहे. त्यांना माहिती प्राप्त झाली आहे तथापि संबंधित माहिती उशिराने मिळाली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी संपूर्ण जिल्ह्यातील शाळांची माहिती मागितली आहे ती वेगवेगळ्या शाळांकडील आहे. सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराने मागितलेली माहिती जिल्ह्यातील सर्व शाळांशी संबंधीत असल्याने या शाळांना ती अर्जदारास परस्पर देण्याचे कळविले आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी दिनांक ०५-०७-२०११ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडे प्रथम अपील दाखल केले त्यावर दिनांक २१-०७-२०११ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्या कार्यालयाकडूनच माहिती मिळण्याची विनंती केल्यानुसार जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनीच माहिती संकलीत करुन अपिलार्थीस द्यावी असा निर्णय घेण्यात आला. जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने पुढे असेही कथन केले आहे की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची व मोठ्या कालावधीची असल्याने ती संकलीत करण्यास काही कालावधी लागला व त्यानंतर दिनांक २०-१०-२०११ रोजी ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य देण्यात आली आहे व अपिलार्थी यांनी त्याची पोच दिली आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती मोठ्या कालावधीची व विस्तृत स्वरूपाची असल्याने त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार माहितीची पाहणी देणे योग्य ठरले असते तथापि जन माहिती अधिकारी यांनी सकारात्मक भूमिका घेऊन अपिलार्थीस माहिती दिली आहे,ही बाब विचारात घेता जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही, या सर्व बाबी विचारात घेता या टप्प्यावर प्रकरण बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मुनावर शहाबुद्दीन नबी रसूल, मु. पो. वाघोली, तालुका जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. वाघ शशिकांत धोंडिबा, : अपिलार्थी
मु. शिराढोण, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, शिराढोण,
तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुऴजापूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२२०८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, शिराढोण, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद - श्री. पी. एन. लाटकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुऴजापूर | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. राऊत एस. एस. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, तुऴजापूर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १७-०२-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २२-०३-२०११ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २२-०३-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १३-०६-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १२-०९-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती अपिलार्थीस देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर यांना दिनांक १५-०१-२०१२ रोजी माहिती मिळाल्याबाबतची पोच दिली आहे, असे आयोगपुढील उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत आहे. अपिलार्थीचे व्दितीय अपील दिनांक ०८-०९-२०११ रोजीचे आहे व त्यानंतर त्यांना माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. वाघ शशिकांत धोंडिबा, मु. शिराढोण, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, शिराढोण, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. कदम संभाजी वसंत,<br>मु. पो. नळदुर्ग, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>नगर परिषद, नळदुर्ग, तालुका तुळजापूर,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, नळदुर्ग, तालुका तुळजापूर,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२२४३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. कदम संभाजी वसंत | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>लिपीक, नगर परिषद, नळदुर्ग, तालुका तुळजापूर,<br>जिल्हा उस्मानाबाद - श्री. कांबळे डी. एल. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, नळदुर्ग, तालुका तुळजापूर,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २५-०३-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ११-०५-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १४-०९-२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांना दिलेली माहिती अपूर्ण आहे, तसेच त्यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केलेला नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, नळदुर्ग, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, नळदुर्ग, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक ११-०५-२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १३-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कदम संभाजी वसंत, मु. पो. नळदुर्ग, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा लिपीक, नगर परिषद, नळदुर्ग, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, नळदुर्ग, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मोहन मारुती दुधभाते, : अपिलार्थी
रा.उमरगा, जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहायक भाषा संचालक,
भाषा संचालनालय,महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,वांद्रे (पूर्व),मुंबई

जन अपिलीय अधिकारी तथा :
भाषा संचालक,
भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय, वांद्रे (पूर्व), मुंबई

१ अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२२७८

२ सुनावणीची तारीख दि. १३-०३-२०१२

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी - श्री. मोहन मारुती दुधभाते : उपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी - सहायक भाषा संचालक, : अनुपस्थित
भाषा संचालनालय,महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,वांद्रे (पूर्व),मुंबई

३.३ जन अपिलीय अधिकारी - भाषा संचालक, : अनुपस्थित
भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय, वांद्रे (पूर्व), मुंबई

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १४.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०५.०३.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २६.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९.०५.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २४.०६.२०१० (मुंबई कार्यालयास प्राप्त) दि. १५.०९.२०११ (औ.बाद कार्यालयास प्राप्त) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जान्वये खालील दोन मुद्यांवर माहिती मागितली आहे.

"३(१)-(१),Ministry of law, Justice and company Affairs (Legislative Department) चे THE SCHEDULE CASTS AND SCHEDULE TRIBES ORDERS (AMENDMENT) ACT, १९७६ No.१०८ of १९७६ (१८ सप्टेंबर १९७६) च्या भारत राज्यपत्राचे मराठी भाषेत अनुवादीत केलेले सत्यप्रत.

३(१)-(२) वरील इंग्रजी राज्यपत्राचे मराठी भाषेत अनुवाद करण्यासाठी (भाषांतर)नेमण्यात आलेल्या कमिटीचे आदेशाची सत्यप्रत, कमिटीतील सदस्यांचे नावच्या यादीची एक सत्यप्रत."

(टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जसाचा तसा घेतला आहे.)

या माहितीसंदर्भात दि. ०५.०३.२०१० रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी तथा सहायक भाषा संचालक यांनी कलम ७(१)नुसार प्रतिसाद दिला असून, मुद्दा क्र.१ बाबत कळविले आहे की, "अनुसूचित जाती आणि अनुसूचित जनजाती आदेश (विशोधन) अधिनियम,१९७६" या अधिनियमाचा अनुवाद भाषा संचालनालयात करण्यात आला असून प्राधिकृत पाठ म्हणून प्रसिध्द झाला आहे आणि विक्रीसाठी चर्नीरोड येथील शासकीय मध्यवर्ती मुद्रणालयामध्ये ठेवण्यात आला आहे. अपिलार्थी यांनी यावर दि. १३.०३.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांना माहितीसंदर्भात पत्र लिहिल्याचे दिसून येत आहे. यामध्ये मुद्दा क्र.१ च्या माहितीसाठी नियमाप्रमाणे फी कळविणे जन माहिती अधिकारी यांना आवश्यक आहे, असे नमूद केले आहे. तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी ₹२५/-शुल्काची रक्कम सहायक भाषा संचालक, मुंबई यांच्या नावाने पाठवावे, असे कळविले आहे. त्या अनुषंगाने अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीने सदरहू माहिती दि. १६.०४.२०१० रोजी सशुल्क प्राप्त केली आहे. त्याबाबतची पोच कागदपत्रांवरुन दिसून येत आहे. त्याचप्रमाणे दि. १६.०४.२०१० रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुद्दा क्र.३(१)-(२)

बाबत कळविल्याचे दिसून येत आहे की, अशाप्रकारे इंग्रजी राजपत्र मराठीमध्ये अनुवादित करण्यासाठी कोणतीही समिती नेमण्यात आलेली नाही.

या सर्व बाबी विचारात घेता उपरोक्त माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिल्याचे तसेच जी माहिती सार्वजनिक प्राधिकरणाकडे उपलब्ध आहे, ती शुल्काचा भरणा करुन भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयातून प्राप्त करुन घेणे अभिप्रेत आहे. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी कळविल्याप्रमाणे अपिलार्थी यांनी माहिती प्राप्त करुन घेतली आहे. या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. या बाबीस अपिलार्थी यांनी सहमती दर्शविली आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोहन मारुती दुधभाते, अभिजीत निवास,महाजन प्लॉट, दळगडे गुड्स ऑफीसशेजारी, शिवपुरी रोड, उमरगा, जि. उस्मानाबाद - ४१३६०६.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक भाषा संचालक,भाषा संचालनालय,महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,वांद्रे (पूर्व),मुंबई-५१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा भाषा संचालक,भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय, वांद्रे (पूर्व), मुंबई -५१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. श्रीराम अनंतराव घुले,<br>रा. तेरखेडा, ता. वाशी, जि.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>१. अध्यक्ष/सचिव,जलस्वराज्य प्रकल्प, तेरखेडा, ता. वाशी, जि.उस्मानाबाद<br>२. ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, तेरखेडा, ता. वाशी, जि.उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वाशी, जि.उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२३०४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. श्रीराम अनंतराव घुले | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रामसेवक,ग्रामपंचायत तेरखेडा, ता.वाशी, जि.उस्मानाबाद - श्री. गरड आर.पी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विस्तार अधिकारी (पं), पंचायत समिती, वाशी, जि.उस्मानाबाद - श्री. गवळी जी.व्ही. | : | उपस्थित |
| ३.४ | अध्यक्ष, ग्रामीण पाणीपुरवठा योजना,तेरखेडा, ता.वाशी, जि.उस्मानाबाद- श्री. भगवान निवृत्ती कडवकर | : | उपस्थित |
| ३.५ | सचिव, ग्रामीण पाणीपुरवठा योजना, तेरखेडा,ता.वाशी,जि.उस्मानाबाद - श्री. प्रभाकर भास्करराव पाटील | : | उपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०८.०६.२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १३.०७.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १८.०८.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६.०९.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोनही बाजूंनी त्यांचे म्हणणे आयोगासमोर कथन केले. अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात कथन केले की, त्यांनी तेरखेडा येथील जलस्वराज्य योजनेअंतर्गत झालेल्या कामाची विविध मुद्यांवर माहिती मागितली आहे. ५० टक्के माहिती मिळाली आहे. उर्वरित माहिती मिळालेली नाही.

अपिलार्थी यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज पाहता मोठया प्रमाणात माहिती मागितल्याचे आढळून येत आहे. अशी माहिती एकत्रित करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज अव्यवहार्य ठरतो. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. प्रसंगी अशाप्रकारच्या माहिती अर्जांवर माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय यापूर्वी देण्यात आलेले आहेत.

अपिलार्थी यांनी उर्वरित माहितीची व्याप्ती स्वेच्छेने कमी करुन खालील माहिती मिळावी अशी विनंती केली.

(१) अंदाजपत्रकाची प्रत नकाशासह. (२) कॅशबुकची प्रत

माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार वरील माहिती देय होत आहे. वरील माहिती अपिलार्थीस विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी. ही बाब जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.),पंचायत समिती, वाशी, जि.उस्मानाबाद यांनी व्यक्तिशः पहावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत तेरखेडा, ता.वाशी, जि.उस्मानाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस

दिवसांच्या आत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. श्रीराम अनंतराव घुले, रा. तेरखेडा, ता. वाशी, जि.उस्मानाबाद ३ ४१३५२५

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत तेरखेडा, ता.वाशी, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), पंचायत समिती, वाशी, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शाम अंबादास पवार,<br>रा. तुळजापूर, जि.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक व्यवस्थापक (प्रशासन),<br>श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर,<br>जि.उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>सरव्यवस्थापक,<br>श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर, जि.उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२३११ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. शाम अंबादासराव पवार | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक व्यवस्थापक (प्रशासन), श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर,जि.उस्मानाबाद - श्री. दिलीप नाईकवाडी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - सरव्यवस्थापक, श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान तथा तहसीलदार तुळजापूर,जि.उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.०५.२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.०६.२०११ |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख दि. १३.०६.२०११

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १९.०९.२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

दोनही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. युक्तिवादावरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी दि. ०४.०५.२०११ रोजीच्या माहिती अर्जान्वये दि. २१.०४.२०११ ते ३०.०४.२०११ या कालावधीमध्ये झालेल्या तुळजाभवानी महोत्सवाबद्दल विविध एकूण १८ मुद्यांवर सविस्तर अशी माहिती मागितली आहे. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार आहेत. अपिलार्थी दारिद्रयरेषेखालील व्यक्ती नाहीत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, तुळजाभवानी ट्रस्ट तर्फे तुळजापूर महोत्सव साजरा करण्यात आला. त्यास शासनाकडून एकरकमी पाच लाख रुपयांचे अनुदान प्राप्त झाले आहे. उर्वरित निधी एकूण सहा विविध कार्यक्रमांद्वारे उभारण्यात आला आहे. अशाप्रकारे एकूण रक्कम ₹४० लाख इतका खर्च या महोत्सवामध्ये झालेला आहे. हा महोत्सव साजरा करण्यासाठी एक समिती नेमण्यात आली होती. समितीने निधी उपलब्धतेसाठी घेतलेल्या विविध कार्यक्रमाकरिता उपजिल्हाधिकारी श्री. चाकूरकर यांच्याकडे आयोजनाचा कार्यभार देण्यात आला होता. त्याबाबतचा हिशोब अद्यापि त्यांच्याकडून प्राप्त व्हावयाचा आहे.

अपिलार्थी यांनी मागितलेल्या १८ मुद्यांपैकी १५ मुद्यांची माहिती मिळाली आहे. खालील तीन मुद्यांची (मुद्दा क्र.१०, ११ व १४) माहिती त्यांना मिळाली नाही.

१) दि. २१.०४.२०११ ते ३०.०४.२०११ या कालावधीमध्ये झालेल्या तुळजाभवानी महोत्सवादरम्यान घेण्यात आलेल्या कार्यक्रमांकरिता छापण्यात आलेल्या तिकीटांच्या विनियोगाचा तपशील. संख्या व खर्च

२) या कार्यक्रमाच्या तिकिट विक्रीबाबत व छपाईकरिता निविदा मागविल्या असल्यास त्याच्या प्रती व धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडून परवानगी घेतली असल्यास त्यासंदर्भातील कागदपत्रे.

३) विशेष निमंत्रितांना पासेस देण्यात आले होते, त्यासंदर्भातील तपशील.

सदरचा तपशील हा उपरोक्त समितीकडे अप्राप्त आहे व त्या बाबत दोन स्मरणपत्रेही पाठविण्यात आली आहेत, असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीमध्ये आयोगासमोर कथन केले.

ही माहिती अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१०,११ व १४ द्वारे मागितलेली आहे. तुळजाभवानी मंदीर संस्थान हे मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदणी झालेले आहे व शासकीय नियंत्रणाखाली आहे. तसेच जन माहिती व अपिलीय अधिकारी नेमण्यात आलेले आहेत.

सदरच्या माहितीमध्ये व्यापक जनहित आहे असे आयोगास दिसून येत आहे.

याकरिता ही माहिती त्वरित संकलीत होऊन नेमक्या स्वरुपात देण्यात येईल ही बाब जिल्हाधिकारी,उस्मानाबाद यांनी स्वतः पहावी, अशी शिफारस आयोगास अधिनियमातील कलम 19(8)(a) नुसार प्राप्त झालेल्या अधिकारानुसार करण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी वरीलप्रमाणे कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शाम अंबादास पवार,रा. क्रांतीचौक,तुळजापूर, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक व्यवस्थापक (प्रशासन),श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर,जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा सरव्यवस्थापक, श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान तथा तहसीलदार, तुळजापूर,जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. दत्तात्रय बाळासाहेब साळुंके,<br>मु.पो. धारगाव, ता.कळंब, जि.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय, घारगाव,<br>ता. कळंब, जि.उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी,<br>पंचायत समिती, कळंब,ता.कळंब, जि.उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२३१३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, धारगाव, ता.कळंब, जि.उस्मानाबाद - श्री. मेनकुदळे बी.एम. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती,कळंब, जि.उस्मानाबाद - श्री. तवले राजेंद्र देविदास | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.०७.२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.०८.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २९.०८.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.०९.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दि. २९.०६.२०११ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये सन २००५ ते २०१० या कालावधीमध्ये घारगाव येथे झालेल्या लमानतांडा सुधारित योजनेअंतर्गत झालेल्या कामाचा तपशील अंदाजपत्रके तसेच मोजमापपुस्तिका इ.च्या प्रती, खर्च व शिल्लक रकमेच्या तपशीलासह माहिती मागितली आहे. या माहितीचे स्वरुप मोठे असल्याकारणाने तीस दिवसांच्या आत संकलीत करुन देणे शक्य नव्हते. जन माहिती अधिकारी यांनी संपूर्ण ५०५ पृष्ठांची माहिती एकत्रित करुन अपिलार्थीस दि. १४.०१.२०११ रोजीच्या पत्रान्वये नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविलेली आहे. त्यामध्ये विविध योजनांच्या माहितीचा तपशील आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दत्तात्रय बाळासाहेब साळुंके,मु. पो. घारगाव, ता.कळंब, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, घारगाव, ता.कळंब, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती,कळंब, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. आप्पासाहेब साहेबा धावारे, : अपिलार्थी
रा. पोहनेर, ता. जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहाय्यक पशुधन विकास अधिकारी, पशुवैद्यकीय दुय्यम श्रेणी -२, चिलवडी, ता.जि.उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती, उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२३१८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. आप्पासाहेब साहेब धावारे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहाय्यक पशुधन विकास अधिकारी, पशुवैद्यकीय दुय्यम श्रेणी -२, चिलवडी, ता.जि.उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. एस.आर.जोगदंड, पशुधन पर्यवेक्षक | : | उपस्थित |
| ३.४ | तत्कालीन जन माहिती अधिकारी - श्री. सरवदे आर.सी. सहाय्यक पशुधन विकास अधिकारी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती, उस्मानाबाद - डॉ. डी.एस.मुरुमकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ११.०४.२०११ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १३.०६.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | १६.०७.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १९.०९.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, तत्कालीन जन माहिती अधिकारी ,जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील पशुधनासाठी वेगवेगळया लसीकरण कामासंदर्भात एकुण दोन मुद्यांद्वारे माहिती मागितली. त्यातील मुद्दा क्र. २ संदर्भातील देय माहिती जन माहिती अधिकारी यांनी दि. ८ व १५ मे, २०११ रोजी अपिलार्थीस प्रत्यक्ष देण्याचा प्रयत्न केला आहे. तथापि अपिलार्थी यांनी माहिती स्वीकारली नाही, असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले.

अपिलार्थी यांनी कथन केले की, त्यांना माहिती मिळाली नाही. आज रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती उपलब्ध आहे. आयोगाच्या सूचनेनुसार अपिलार्थीस देण्यात आली. अपिलार्थी यांनी स्वीकारली.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. आप्पासाहेब सोहबा धावोर,रा. पोहनेर, ता. जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पशुधन विकास अधिकारी, पशुवैद्यकीय दुय्यम श्रेणी -२, चिलवडी, ता.जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विठ्ठल श्रीपती शिंदे, : अपिलार्थी
रा. रोसा, ता. परंडा, जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तालुका कृषि अधिकारी,
परंडा, जि.उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
तालुका कृषि अधिकारी,
परंडा, जि.उस्मानाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२३३२ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. विठ्ठल श्रीपती शिंदे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कृषि अधिकारी,तालुका कृषि अधिकारी कार्यालय,परंडा, जि.उस्मानाबाद - श्री. देशमुख आर.आर. | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तालुका कृषि अधिकारी, परंडा, जि.उस्मानाबाद - श्री. जाधव आर.टी. | : उपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३.०५.२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०८.०७.२०११ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०५.०८.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०७.०९.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २०.०९.२०११ (फेरसादर,दि.०१.१२.२०११) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोनही बाजूंनी त्यांचे म्हणणे आयोगासमोर कथन केले.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्रयस्थ श्री. विक्रम देवराव नलवडे यांनी मौ. रोसा ता. परंडा येथील जमीन गट नं. ३५ क्षेत्र ८८ आर खरेदी करण्यासाठी शासनाची अनुमती घेतली होती काय, अशी माहिती मागितली आहे. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार आहेत. अपिलार्थी यांचा अर्ज दि. १९.०५.२०११ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्रयस्थ पक्षाची असल्यामुळे त्रयस्थांकडून माहिती प्राप्त करुन घेण्यात आली व दि. ०८.०७.२०११ रोजी अपिलार्थीस त्यानुसार कळविण्यात आले आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय,परंडा, जि.उस्मानाबाद यांनी स्पष्ट केले की, त्यांच्या कार्यालयातील अभिलेखांवरुन त्रयस्थांनी उपरोक्त भूखंडांची खरेदी करण्याबाबत शासनाची परवानगी घेतलेली आढळून येत नाही.

या बाबी विचारात घेता प्रकरण बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विठ्ठल श्रीपती शिंदे,रा. रोसा, ता. परंडा, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी,तालुका कृषि अधिकारी कार्यालय,परंडा, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,कृषि अधिकारी कार्यालय,परंडा, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बसप्पा भिमाशंकर मस्के, : अपिलार्थी
रा. तुळजापुर, जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपविभागीय पोलीस अधिकारी, तुळजापूर, जि.उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२३९२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बसप्पा भिमाशंकर मस्के | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय पोलीस अधिकारी, तुळजापूर, जि.उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. एस.एन.साबळे, पोलीस उपनिरीक्षक, तुळजापूर, जि.उस्मानाबाद | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अपर पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २९.०४.२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १६.०६.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.०९.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोनही बाजूंनी त्यांचे म्हणणे आयोगासमोर कथन केले.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या दि. १६.०६.२०११ रोजीच्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक उस्मानाबाद यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिलेला नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे.अपिलार्थी यांनी एकूण १४ मुद्यांसंदर्भात माहिती मागितलेली आहे. तुळजापूर शहरामधील ॲटोरिक्षासंदर्भात माहिती मागितली असल्याचे दिसून येत आहे. यामध्ये जनहित दिसून येत आहे. यास्तव जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक,उस्मानाबाद यांनी अपिलार्थीच्या दि.१६.०६.२०११ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन मुद्देनिहाय निर्णय द्यावा, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.यास्तव प्रकरण त्यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक,उस्मानाबाद यांनी अपिलार्थीच्या दि.१६.०६.२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०३-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बसप्पा भिमाशंकर मस्के,रा.एस.टी.कॉलनी, तुळजापूर, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, तुळजापूर, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. गोपाळ काशिनाथराव नवले,रा. उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>विभाग प्रमुख,<br>कर आकारणी बांधकाम परवाना विभाग, नगर परिषद,<br>उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी,<br>नगर परिषद, उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२३९९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. गोपाळ काशिनाथराव नवले | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कनिष्ठ अभियंता, नगर परिषद, उस्मानाबाद - श्री. लोंढे पी.डी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी,नगर परिषद, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०४.२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०५.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २१.०६.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७.०९.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोनही बाजूंनी त्यांचे म्हणणे आयोगासमोर कथन केले.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे नगर पालिका उस्मानाबादमार्फत देण्यात आलेल्या बांधकाम परवाना व कर आकारणीबाबत त्रयस्थाची माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियमानुसार जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी कलम ७(७) व कलम ११ नुसार त्रयस्थांची बाजू ऐकून घेणे आवश्यक आहे. तदनंतर व्यापक जनहिताच्या कसोटीवर माहिती देणे योग्य ठरत आहे किंवा कसे याबाबतचा निर्णय घेणे आवश्यक ठरत आहे. अपिलार्थी यांनी या माहिती अर्जामध्ये प्रश्नार्थक स्वरुपाची, खुलासा अपेक्षित करणारी माहिती मागितल्याचे असल्याचे दिसून येत आहे. त्यामागील भूमिका विचारात घेऊन आवश्यक कागदपत्रे अपिलार्थीस देय होत आहेत. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सुनावणीसाठी परत पाठविण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,नगर परिषद, उस्मानाबाद यांनी अपिलार्थीच्या दि.०९.०५.२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गोपाळ काशिनाथराव नवले,रा.२६/१०१, समर्थनगर, उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, नगर परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,नगर परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विसाळ अशिष प्रल्हाद, : अपिलार्थी
रा. उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
जिल्हा वैद्यकीय अधिकारी,
जिल्हा क्षयरोग केंद्र, उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा क्षयरोग अधिकारी, जिल्हा क्षयरोग केंद्र, उस्मानाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२४०० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. विसाळ अशिष प्रल्हाद | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - वैद्यकीय अधिकारी, जिल्हा क्षयरोग केंद्र, उस्मानाबाद - डॉ. आर.एन.देशमुख | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा क्षयरोग अधिकारी, उस्मानाबाद | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ११.०७.२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १२.०८.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २७.०९.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोनही बाजूंनी त्यांचे म्हणणे आयोगासमोर कथन केले.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जान्वये माहितीची मागणी करताना "स्टेशनरी व इतर खरेदीबाबत" असे मोघमपणे नमूद केले आहे. माहिती माहे जून, २००७ ते जून २०११ अशी चार वर्षांची आहे. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा क्षयरोग अधिकारी, उस्मानाबाद सुनावणी घेऊन निर्णय दिल्यानंतर अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे. एकूण ४६८ पृष्ठांची दिली आहे. ही माहिती चुकीची व खोटी आहे असे अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये प्रतिपादन केले. तथापि युक्तिवादावरुन असे आढळून येत आहे की, जी माहिती उपलब्ध आहे ती माहिती अपिलार्थीस मिळाली आहे. मिळालेली माहिती खोटी व दिशाभूल करणारी व अपुरी आहे, असे त्यांच्या लेखी युक्तिवादामध्ये नमूद केले. यासंदर्भात अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास योग्य त्या प्राधिकरणाकडे दाद मागू शकतात.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विसाळ अशिष प्रल्हाद,वात्सल्य निवास,यशवंतनगर, टी.पी.एस.रोड, बार्शी नाका, उस्मानाबाद -४१३ ५०१.

२. जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी,जिल्हा क्षयरोग केंद्र, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा क्षयरोग अधिकारी,जिल्हा क्षयरोग केंद्र, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. चंद्रकांत राम बनसोडे, : अपिलार्थी
रा. उमरगा (चिवरी),ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, उमरगा (चिवरी),
ता. तुळजापूर, जि.उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी (वर्ग-१),
पंचायत समिती, तुळजापूर, जि.उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२४१७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. चंद्रकांत राम बनसोडे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय, उमरगा (चिवरी),ता. तुळजापूर, जि.उस्मानाबाद - कु. चव्हाण गायत्री माणिकप्रभू | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - गट विकास अधिकारी (वर्ग-१), पंचायत समिती, तुळजापूर, जि.उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. राऊत एस.एस., विस्तार अधिकारी (पं.) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०१.०६.२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०४.०७.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २७.०९.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये सन २००० ते २०११ अशी अकरा वर्षांची विस्तृत माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय, उमरगा (चिवरी),ता. तुळजापूर, जि.उस्मानाबाद यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती विचारात घेऊन अपिलार्थीस कार्यालयात उपस्थित राहून अभिलेखांची पाहणी करावी, असे कळविलेले आहे. त्यावर अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थी यांनी सदरचे पत्र त्यांना प्राप्त झाले नाही, असे त्यांच्या युक्तिवादात कथन केले आहे. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती कमी करुन मागील तीन वर्षांची खालील माहिती देण्यात यावी, असा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला.

१) सन २००८-०९, २००९-१० व २०१०-११ या तीन वर्षात प्रतिवर्षी प्राप्त झालेला निधी व मागासवर्गीयांसाठी केलेल्या खर्चाचा तपशील.

२) मागासवर्गीय वस्तीसाठी शासनाकडून तीन वर्षात झालेल्या खर्चाचा तपशील.

३) ग्रामपंचायतीला शासनाकडून विविध योजनेअंतर्गत प्राप्त झालेला निधी व झालेला खर्च

४) नमुना नं. ८-अ, रहिवाशी प्रमाणपत्र, ना-हरकत प्रमाणपत्र यासाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्काचा तपशील.

ही माहिती अपिलार्थीस देय होत आहे.वरील चार मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच दोन महिन्याचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठविण्याची व्यवस्था करावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, उमरगा (चिवरी), ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे चार मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच दोन महिन्याचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविण्याची व्यवस्था करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. चंद्रकांत राम बनसोडे,रा. उमरगा (चिवरी),ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय, उमरगा (चिवरी),ता. तुळजापूर, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी (वर्ग-१),पंचायत समिती, तुळजापूर, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री.चंद्रकांत रंगनाथ काळे,<br>रा.औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>नगररचना विभाग,<br>महानगरपालिका,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक संचालक,<br>नगररचना विभाग,महानगरपालिका,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/३५१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपअभियंता (नगररचना), महानगरपालिका,औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. के.पी.घुगे, शाखा अभियंता | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - सहायक संचालक, नगररचना, महानगरपालिका,औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०८.१२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १०.०१.२०११ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २७.०१.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०७.०२.२०११ |

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दि. ०२.०२.२०१२ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित होते. त्यावेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी प्रकरणात आवश्यक कागदपत्रे सादर करण्यासाठी पुढील तारीख देण्याची आयोगास विनंती केल्यामुळे प्रकरणात आयोगातर्फे सुनावणीची पुढील तारीख १४.०३.२०१२ निश्चित करण्यात आली होती. त्यानुसार आज रोजी सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. त्यांनी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे आयोगास अहवाल सादर करण्यासाठी सुनावणीची पुढील तारीख देण्याची विनंती केली.

उपरोक्त विनंतीनुसार आयोगातर्फे सदर प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची पुढील सुनावणी दि. २४.०४.२०१२ रोजी सकाळी ११.३० वा. होईल. या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १४-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. चंद्रकांत रंगनाथ काळे, २१, चैतन्य गुरुनगर,सिडको, एन-८,एफ-४,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता (नगररचना), महानगरपालिका,औरंगाबाद

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक, नगररचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेषेराव महादेव कानाडे, — अपिलार्थी
रा.वरुडा, ता. जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय,उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/५५६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, उस्मानाबाद - पी. एम.सोनटक्के | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, तहसील कार्यालय,उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.११.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.०१.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.०३.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी सन १९६८ ते ६९ सालाची माहिती मागितली आहे. या माहितीमध्ये श्री. पांडुरंग नरहरी कानाडे यांना दिलेल्या गावठाणातील जागेविषयी माहिती मागितली आहे. या अर्जामध्ये - सन १९६८-६९

सालचा कबाला वरुडा ग्रा.पं.घर नं. ३६८ -एवढाच उल्लेख केलेला आहे. त्यामुळे नस्तीचा शोध घेणे चालू आहे. अद्यापपावेतो ती मिळालेली नाही असे दि. १२.०३.२०१२ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस कळविण्यात आले आहे. पुढे त्यांनी असेही कथन केले की, सदरची माहिती ग्रामपंचायत, वरुडा येथूनही मिळण्याची शक्यता आहे व अपिलार्थीस तेथेही मागणी करावी, असे कळविण्यात आले आहे.

या सर्व बाबी विचारात घेता, तहसीलदार,उस्मानाबाद यांनी दोन कर्मचाऱ्यांचा एक गट तयार करुन संबंधित नस्तीचा शोध घ्यावा व त्याबाबतचे निष्कर्ष अपिलार्थीस कळवावे. तसेच अपिलार्थी यांनी स्वतंत्र अर्ज ग्रामपंचायत,वरुडा यांच्याकडे करणे योग्य राहील, असे आयोगाचे मत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

तहसीलदार, उस्मानाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच एक महिन्याच्या आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १४-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेषेराव महादेव कानाडे, मु.पो.वरुडा, ता.जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सुर्यवंशी विवेकानंद महादेव,<br>रा. सांजा, ता.जि.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामविकास अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,सांजा,<br>ता.जि.उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत),<br>पंचायत समिती कार्यालय, उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/५५७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सुर्यवंशी विवेकानंद महादेव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रामविकास अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,सांजा,ता.जि.उस्मानाबाद - श्री. बी.व्ही.शिंदे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती कार्यालय, उस्मानाबाद- श्री. एन.एस.राठोड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०५.१०.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २९.१२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०३.०३.२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. ०५.१०.२०१० रोजीच्या माहिती अर्जासोबत प्रश्नपत्रिका जोडली आहे व त्याप्रमाणे माहिती मागितली. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) मधील 'माहिती' च्या व्याख्येत सदर माहिती बसत नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे माहिती देण्यात आली नाही. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय घेऊन अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती प्रश्नार्थक व खुलासा मागणारी असल्याने ही माहिती देणे कलम २(च) नुसार बंधनकारक नसल्याचे नमूद करुन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील फेटाळले. अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात स्वेच्छेने माहितीची व्याप्ती कमी करुन त्यांना खालीलप्रमाणे माहिती देण्यात यावी, अशी आयोगास विनंती केली.

१) सन २००५ ते २०१० या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालयाला प्राप्त निधी व झालेला खर्च

२) सन २००५ ते २०१० या कालावधीतील मासिक सभेच्या ठरावाच्या प्रती.

३) सन २००५ ते २०१० या कालावधीत ग्रामपंचायतीला मिळालेल्या उत्पन्नाचा तपशील.

वरील माहिती अपिलार्थीस देय होत आहे. यासाठी जन माहिती अधिकारी यांनी वरील तीन मुद्यांवरील माहिती संकलीत करुन अपिलार्थीस एका महिन्याच्या आत शुल्काची रक्कम कळवावी व अपिलार्थीने शुल्काची रक्कम भरणा केल्यानंतर पंधरा दिवसांच्या आत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती पाठवावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,सांजा,ता.जि.उस्मानाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस शुल्काची रक्कम आयोगाचे आदेश प्राप्त होताच एका महिन्याच्या आत कळवावी व अपिलार्थी यांनी शुल्काची रक्कम भरणा केल्यावर पंधरा दिवसांच्या आत अपिलार्थीस छायाप्रतीच्या स्वरुपात माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुर्यवंशी विवेकानंद महादेव,रा. सांजा, ता.जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,सांजा,ता.जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत),पंचायत समिती कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. वीर वसंत यशवंत,<br>रा. उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार,तहसील कार्यालय, उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार,<br>तहसील कार्यालय, उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/५६० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार, उस्मानाबाद - श्री. पी.एम.सोनटक्के | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार,तहसील कार्यालय, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २३.०९.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.१०.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.०३.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली संपूर्ण माहिती दि. १३.०३.२०१२ रोजी देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी तशी पोच दिलेली आहे. आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन ही बाब दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. वीर वसंत यशवंत,गांधीनगर, दळवी हाऊस, उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. दत्तात्रय रुपानाथ मुंढे,<br>रा. सोनारवाडी, पो.मस्सा (खं),ता.कळंब,जि.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, वाशी, ता. वाशी, जि.उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/६१७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. दत्तात्रय रुपानाथ मुंढे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, वाशी, जि.उस्मानाबाद - श्री. शे.सा. हाजगुडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, उस्मानाबाद - श्री. अ.ह.किरनळे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०४.०८.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २५.१०.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०२.०२.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.०३.२०११<br>(फेरसादर,दि. ०२.१२.२०११) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जान्वये सन २०००-२००१ साली त्यांनी मौ. मस्सा (खंडेश्वरी),ता.कळंब, जि.उस्मानाबाद येथील जमिनीत केलेल्या आंबा लागवडीसाठी वाटप केलेल्या अनुदानाबाबतची माहिती मागितली आहे. याबाबत कागदपत्रे उपलब्ध होत नसल्यामुळे त्यांना उर्वरित अनुदान मिळाले नाही. त्यामुळे त्यांनी दि.०४.०८.२०१० रोजीच्या मूळ माहितीच्या अर्जान्वये त्यावेळी कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांचे पूर्ण नाव,पदनाम इ.चा तपशील मागितला आहे. सदरची नस्ती कळंब परिक्षेत्रातील होती. आता नवीन तालुका वाशी या तालुक्याची निर्मिती झालेली आहे. तथापि कळंब तालुक्यातील कागदपत्रे हस्तांतरित करण्यात आलेली नाहीत. वाशी कार्यालयातर्फे ही कागदपत्रे मिळण्यासाठी पत्रव्यवहार करण्यात आला. तथापि त्यांना ती प्राप्त झालेली नाहीत. कळंब येथील कागदपत्रे वाशी कार्यालयास मिळणे आवश्यक आहे. याकरिता वाशी कार्यालयाने एक कर्मचाऱ्यांची नेमणूक करुन ही माहिती कळंब तालुक्यातून संकलीत करुन अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, वाशी, जि.उस्मानाबाद वाशी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करुन अपिलार्थीस पंधरा दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दत्तात्रय रुपानाथ मुंढे,रा. सोनारवाडी, पो.मस्सा (खं),ता.कळंब,जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, वाशी, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. नागेशशास्त्री विठ्ठलशास्त्री नंदीबुवा अंबुलगे,<br>रा. तुळजापुर, ता. तुळजापूर, जि.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>सहाय्यक व्यवस्थापक (प्रशासन),<br>श्री. तुळजाभवानी मंदीर संस्थान, तुळजापूर,<br>ता. तुळजापूर, जि.उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय,तुळजापूर,जि.उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/६३७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. नागेशशास्त्री विठ्ठलशास्त्री नंदीबुवा अंबुलगे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.११.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २४.१२.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १४.०१.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २५.०१.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०३.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर त्यांची बाजू मांडताना कथन केले की, त्यांना अपूर्ण माहिती मिळाली आहे. उपलब्ध कागदपत्रांवरुन या प्रकरणी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्यामुळे आयोगातर्फे सदर प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. या बाबीची नोंद सर्व संबंधितांनी घ्यावी, असे आयोगाचे निदेश आहेत. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची पुढील सुनावणी दि. १९.०४.२०१२ रोजी सकाळी ११.३० वा. होईल. या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नागेशशास्त्री विठ्ठलशास्त्री नंदीबुवा अंबुलगे,रा. तुळजापुर, ता. तुळजापूर, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक व्यवस्थापक (प्रशासन),श्री. तुळजाभवानी मंदीर संस्थान, तुळजापूर,ता. तुळजापूर, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,तुळजापूर,जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विठ्ठल तुळशीराम माने, : अपिलार्थी
रा. नागराळ, पो. गुंजोटी, ता. उमरगा, जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार (महसूल),
तहसील कार्यालय,उमरगा, जि.उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार,
तहसील कार्यालय,उमरगा,जि.उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/६३९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तलाठी, सजा नागराळ,ता.उमरगा,जि.उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (म), सजा नागराळ,ता.उमरगा,जि.उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.चामे बी.डी., लिपीक | : | उपस्थित |
| ३.५ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, उमरगा, जि.उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७.०९.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १२.११.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १६.१२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १४.०३.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मौजे नागराळ येथील नागराळ- तुगाव रोडलगत गोडाऊनचे दगडी बांधकाम व अन्य बांधकाम नागराळ जमीन गट क्र. ३२/१ त्रयस्थ श्री. अरुण राणबा पाटील यांची मालकी जमिनीत आहे किंवा शासकीय गावठाण जमिनीत आहे किंवा अन्य जमिनीत आहे, याची प्रत्यक्ष पाहणी करुन मोजमापासह तंतोतंत माहिती - अशी माहिती मागितली आहे. अशाप्रकारची माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च)मध्ये बसत नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलासंदर्भात असाच निर्वाळा देऊन प्रकरण निकाली काढले आहे. तथापि आयोगाचे असे मत आहे की, सदरचे गोडाऊनचे बांधकाम ज्या गावातील आहे, व ज्या जमिनीवर आहे, त्या जमिनीच्या ७/१२ ची प्रत अपिलार्थीस देण्यात यावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म), तहसील कार्यालय,उमरगा यांनी संबंधित जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा नागराळ, ता.उमरगा हे वर नमूद केलेली माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवतील, याची दक्षता घ्यावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विठ्ठल तुळशीराम माने,रा. नागराळ, पो. गुंजोटी, ता. उमरगा, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा नागराळ, ता.उमरगा, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल),तहसील कार्यालय,उमरगा, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,तहसील कार्यालय,उमरगा,जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कांबळे प्रदीपकुमार जालींदर, : अपिलार्थी
रा.उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी,
महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय,
उस्मानाबाद.

जन अपिलीय अधिकारी तथा :
विभाग नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/६४२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. कांबळे प्रदीपकुमार जालींदर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय, उस्मानाबाद - श्री. ए.टी.गायकवाड | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, उस्मानाबाद - श्री. पी.आर. लाखाळ पाटील | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.१२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०३.०१.२०११ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.०१.२०११ |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख दि. २१.०२.२०११

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १४.०३.२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनाक २१-१२-२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये वाहक (कनिष्ठ) पदाची भरती २०१० मध्ये निवड झालेल्या एस. सी. प्रवर्गातील ३७ उमेदवारांच्या व तसेच स्वतःच्या लेखी व मुलाखतीच्या गुणांची माहिती मागितली आहे. याबाबत दिनांक ०३-०१-२०११ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस कळविण्यात आले आहे की, वाहक (कनिष्ठ) पदासाठी पात्र उमेदवारांचे लेखी परिक्षेत व मुलाखतीत मिळालेले गुण हे त्यांचे वैयक्तिक गुण आहेत त्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (१) (घ) (ड) व (ञ) नुसार सदर माहिती देता येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी पुढे असेही सांगितले की, लेखी परिक्षेत मिळालेले गुण व मुलाखत घेतलेल्या निवड समितीने दिलेल्या गुणाच्या आधारे मेरीट लिस्ट तयार करण्यात आली. प्रत्येक उमेदवारास मिळालेले गुण निवड समितीने त्यांच्या उपस्थितीत व सुरक्षा अधिकारी यांचे समक्ष सिलबंद केलेले आहेत. सदरचे गुण उघड करण्याचे अधिकार त्यांना नाहीत. अपिलकर्ते यांचे नांव लेखी परिक्षेत पास असणा-या १३३२ उमेदवारामध्ये असले तरी वाहकाची निवड यादी उमेदवारास लेखी परिक्षेत मिळालेले गुण व मुलाखतीत मिळालेले गुण एकत्रित करुन तयार केलेली आहे. तसेच प्रत्यक्ष निवड यादी ही लेखी परिक्षेत मिळालेल्या गुणांना ९० टक्के भारांक व मुलाखतीत मिऴालेल्या गुणांना १० टक्के भारांक देऊन तयार केली जाते. त्यामुळे केवळ मुलाखतीच्या गुणावर निवड होत नाही व अपिलकर्त्यांना निवड यादीतील उमेदवारांइतके गुण न मिऴाल्याने त्यांची निवड झालेली नाही. सर्व उमेदवारांचे गुण कमिटीने सिलबंद केलेले असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांचे गुण कळविलेले नाहीत, तसेच अपिलकर्ते यांना त्यांच्या वैयक्तिक गुणांबाबत माहिती देणे शक्य आहे,परंतु इतर उमेदवारांच्या गुणांची यादी त्यांना पुरविता येणार नाही. त्यामुळे दिनांक ०७.०३.२०१२ रोजी अपिलार्थीस केवळ त्यांचेच लेखी परिक्षेत व मुलाखतीत मिळालेले गुण कळविण्यात आले आहेत.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २१-०२-२०११ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांचे प्रथम अपील फेटाळण्याचा निर्णय घेतला आहे.त्यानतंर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०७.०३.२०१२ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांच्या वैयक्तिक गुणांची माहिती दिलेली आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये ३७ उमेदवारांच्या गुणांची माहिती मागितली आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने अशी गुणांची यादी प्रसिध्द केलेली नाही त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती देण्यात आलेली नाही. या सर्व बाबी विचारात घेता या टप्प्यावर प्रकरण बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. परंतु भविष्यात होणा-या भरती

प्रक्रियेच्या लेखी व मौखिक परिक्षेतील सर्व उमेदवारांच्या गुणांची यादी प्रसिध्द करावी, अशी शिफारस विभाग नियंत्रक,विभागीय कार्यालय,महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ,उस्मानाबाद यांना आयोगातर्फे करण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १४-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कांबळे प्रदीपकुमार जालींदर, तांबरी विभाग, लिंबुणीबाग, शिवाजीनगर,शिंगाडे गिरणी, कांबळे निवास, उस्मानाबाद - ४१३ ५०१.

२. जन माहिती अधिकारी तथा विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी,महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. अमरराजे कदम परमेश्वर<br>रा.तुळजापूर, जि.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),<br>विभाग, उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/६९७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, उस्मानाबाद - श्री. कारीमुंगी नि.रे. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. ए.आर.सरोदे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०८.०५.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०४.०६.२००८ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २२.०६.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१.०७.२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत.जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधीउपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये दि. ०१.०१.२००० ते सन २००६ या कालावधीमध्ये रोजगार हमी योजनेतून तुळजापूर तालुक्यात झालेल्या पाझर तलावाबाबत सविस्तर माहिती मागितली आहे. सदरची माहिती पाठविण्याकरिता ₹१३५/- शुल्काचा भरणा करावा, असे अपिलार्थीस अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे दि. ०४.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७(१) मधील तरतुदीनुसार विहित मुदतीत कळविलेले आहे. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेतली. त्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय घेतला आहे की, अपिलार्थी यांनी सदरच्या शुल्काचा भरणा पंधरा दिवसांच्या आत करावा व जन माहिती अधिकारी यांनी माहिती पाठवावी. अपिलार्थी यांनी आजपर्यंत शुल्काचा भरणा केलेला नाही. अपिलार्थी हे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती नाहीत.

वरील बाबी विचारात घेता अपिलार्थी यांना माहितीची आवश्यकता असल्यास त्यांनी पंधरा दिवसांच्या आत रु. १३५/- शुक्लाचा भरणा करावा. तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती पाठवावी. या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपिलार्थी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे हे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात शुल्काचा भरणा करावा तदनंतर पुढील पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १४-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अमरराजे कदम परमेश्वर,राजगड मनसे कार्यालय, नळदुर्ग रोड,तुळजापूर, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कैलास विश्वासराव शिंदे, : अपिलार्थी
रा. शेळगाव, ता.परंडा, जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय,शेळगाव, ता.परंडा, जि.उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, परंडा, ता. परंडा, जि.उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/७२५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रामविकास अधिकारी,ग्रामपंचायत कार्यालय,शेळगाव, ता.परंडा, जि.उस्मानाबाद- श्री. एल. बी. भिसे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, परंडा, ता. परंडा, जि.उस्मानाबाद - श्री. पी.एस.इंगळे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २२.०९.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २७.१०.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ११.०३.२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या संपूर्ण माहितीच्या प्रती अपिलार्थीस देण्यात आलेल्या आहेत. त्यासंदर्भात अपिलार्थी यांनी दि. १४.०२.२०१२ रोजीच्या पत्राद्वारे राज्य माहिती आयोगाच्या औरंगाबाद खंडपीठास कळविलेले आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कैलास विश्वासराव शिंदे,मु.पो. शेळगाव, ता. परंडा, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी,ग्रामपंचायत कार्यालय,शेळगाव, ता.परंडा, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, परंडा, ता. परंडा, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. ताटे मोहन अभियान,<br>रा.मस्सा (खं.), ता.कळंब, जि.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल व पुरवठा),<br>उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/७३१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. ताटे मोहन अभियान | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म.), तहसील कार्यालय, उस्मानाबाद - श्री. पी.एम.सोनटक्के | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०४.१०.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.११.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १४.१२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.०३.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी उस्मानाबाद तालुक्यातील सर्व गावांमधील गायरान जमिन धारकांची जमीन नावावर होण्याबाबतच्या प्रक्रियेची माहिती गावनिहाय मागितली आहे. या माहितीमध्ये - जमिनीवर किती लोकांचे अतिक्रमण आहे, अर्जाच्या दिनांकापर्यंत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे गायरान धारकांनी सादर केलेल्या प्रस्तावांची संख्या, त्यापैकी किती लोकांचे गायरान पट्टे नावावर झालेले आहेत, सन १९९० पर्यंत नावावर झालेल्या पट्टयांची संख्या, पंचनामे झालेल्या व निकाली काढलेल्या गायरानधारकांची संख्या, निकाली न काढलेल्या प्रस्तावातील त्रूटी व गावातील १-इला नोंद झालेल्या गायरान जमिनींची संख्या - या मुद्यांचा समावेश आहे. ही माहिती विस्तृत स्वरुपातील आहे. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती विचारात घेता एवढी माहिती एकत्रित करण्यास अधिनियमामध्ये विहित करुन दिलेला कालावधी पुरेसा नाही. अशी माहिती एकत्रित करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज अव्यवहार्य ठरतो. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलाच्या निर्णयानंतर दि. २७.१२.२०१० रोजीच्या पत्राद्वारे माहिती तयार आहे, असे कळविलेले आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात कथन केले की, त्यांना सदरचे पत्र प्राप्त झालेले नाही व त्यांना माहिती मिळाली नाही म्हणून जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करावी.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध असल्याबाबत कळविले आहे. तथापि अपिलार्थी यांना सदरचे पत्र प्राप्त झाले नाही. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार असे त्यांच्या माहितीच्या मूळ अर्जामध्ये नमूद केल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने जर व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर त्यासंदर्भातील पुढील घडामोडी, माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी लागणारे आवश्यक ते शुल्क, माहितीचा तपशील इत्यादी प्राप्त करुन घेणे हे अर्जदाराचे संपूर्ण उत्तरदायित्त्व असते. त्याप्रमाणे या प्रकरणी अपिलार्थी यांनी त्यांचे उत्तरदायित्त्व पार पाडलेले दिसून येत नाही. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती विचारात घेता सदर माहिती एक महिन्याच्या आत माहिती संकलीत करुन देणे शक्य नव्हते, ही बाब देखील विचारात घ्यावी लागेल. या सर्व बाबी विचारात घेता जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७(६) नुसार उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## **आदेश**

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म.), तहसील कार्यालय, उस्मानाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. ताटे मोहन अभिमान, मु.पो. मस्सा (खं.), ता.कळंब, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म.), तहसील कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. आप्पासाहेब लिंबराज महानवर,<br>रा.कंडारी, ता.परंडा, जि.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी,<br>विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांचे कार्यालय, उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांचे कार्यालय, उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/७६८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अधीक्षक, विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालय, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. गवळी आर.बी. लिपीक | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०९.१२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १८.१२.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १७.०१.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०३.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी, विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी कार्यालय यांच्याकडे, सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेमधील वि.जा./ भ.ज.च्या इयत्ता ८ ते १० वीच्या भैरवनाथ विद्यालय,कंडारी, व पार्वतीबाई दैठणकर विद्यालय, रत्नापूर व जि.प.प्रशाला, सोनारी, ता. परंडा, जि.उस्मानाबाद या शाळांची सन २००८-०९ व २००९-१० या दोन वर्षांसाठी प्राप्त झालेल्या रकमेबाबत चेक नंबर व दिनांक इ.तपशीलासह माहिती मागितली आहे. सदरची माहिती अपिलार्थीस पुरविण्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी दि. १८.१२.२०१० रोजी तीनही शाळांना कळवून अपिलार्थीस त्या पत्राची प्रत दिल्याचे दिसून येत आहे. यावर अपिलार्थी यांना मुख्याध्यापक, श्रीमती पार्वतीबाई दैठणकर महाविद्यालय,रत्नापूर यांनी दि. ०८.०१.२०११, मुख्याध्यापक,जि.प.शाळा सोनारी यांनी दि. २७.१२.२०१० रोजी व मुख्याध्यापक, भैरवनाथ माध्यमिक विद्यालय,कंडारी यांनी दि. ३०.१२.२०१० रोजी माहिती पाठविल्याचे दिसून येत आहे. सदर माहिती अधिनियमातील कलम ७(१) नुसार विहित मुदतीत दिल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी आज अनुपस्थित आहेत. त्यांनी त्यांच्या द्वितीय अपिलामध्ये योग्य माहिती मिळाली नाही असे मोघमपणे नमूद केले आहे. नेमके नमूद केलेले नाही.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. आप्पासाहेब लिंबराज महानवर, रा. कंडारी, ता.परंडा, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. फारुक उस्मान शेख,<br>रा. कुंभेफळ, ता.परंडा, जि.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कुंभेफळ, ता.परंडा,<br>जि.उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, परंडा,<br>जि.उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/७८३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -ग्रामसेवक, ग्रामपंचायत कुंभेफळ, ता.परंडा, जि.उस्मानाबाद - श्री. पी. टी. खटकाळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, परंडा, जि.उस्मानाबाद - श्री. पी.एस.इंगळे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २७.१२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.०१.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २८.०२.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.०३.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांनी आयोगासमोर कथन केले की, ते कंत्राटीपध्दतीने सेवेत कार्यरत आहेत. मध्यंतरीच्या कालावधीत आजारी होते. अपिलार्थी यांनी सन २००५-१० अशी पाच वर्षांच्या कालावधीची कुंभेफळ, ता. परंडा जि. उस्मानाबाद ग्रामपंचायतीअंतर्गत विविध योजनांची वर्षनिहाय खर्चाची माहिती तसेच मासिक मिटींगच्या, ग्रामसभेच्या प्रोसिडींगच्या झेरॉक्सप्रती, कॅशबुकच्या नकला इ.माहिती मागितली आहे. सदरची माहिती संकलीत करण्यास कालावधी लागला व अपिलार्थीस दि. ०२.०१.२०१२ रोजी एकूण १९४ पृष्ठांची माहिती विनामूल्य देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांची पोच त्यांच्या अभिलेखात उपलब्ध आहे. तसेच अपिलार्थीने आयोगास माहिती मिळाल्याचे कळविले आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १४-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. फारुक उस्मान शेख,रा. कुंभेफळ, ता.परंडा, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कुंभेफळ, ता.परंडा, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, परंडा, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विलास विष्णुदास मोरे, : अपिलार्थी
रा.गुगळीधामणगाव,ता.सेलू,
जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार,
तहसील कार्यालय,पालम, ता.पालम,जि.परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
उपविभागीय अधिकारी,
उपविभागीय अधिकारी कार्यालय, परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८१८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १४-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. विलास विष्णुदास मोरे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तहसीलदार, तहसील कार्यालय,पालम, ता.पालम,जि.परभणी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, परभणी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०२.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५.०२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १९.०४.२०१० |

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांनी दिनांक ०२-१२-२००९ च्या माहितीच्या अर्जान्वये पूर्णा तहसील कार्यालयाची एकूण १२ मुद्दयावर माहिती मागितली आहे. सदरची माहिती जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पालम, तालुका पालम, जिल्हा परभणी यांनी विहित मुदतीत दिली नाही. त्यामुळे अपिलार्थीने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, परभणी यांच्याकडे दिनांक १६-०१-२०१० रोजी प्रथम अपील सादर केले त्यावर दिनांक १५ फेब्रुवारी २०१० रोजी निर्णय घेण्यात आला की, अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्यात यावी. परंतु अद्यापपावेतो अपिलार्थीस माहिती मिळालेली नाही.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक ०२-१२-२००९ च्या माहिती अर्जान्वये दिनांक ०१ जानेवारी २००८ ते माहिती अर्ज सादर करण्याच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीची विविध मुद्यावर तहसील कार्यालय, पालम यांच्याकडे पालम तालुक्याातील स्वस्त धान्य दुकानाबाबतची तसेच तहसीलदाराच्या दैनंदिनीच्या प्रती, तहसील कार्यालयाकडे किती शासकीय वाहने होती, वाहनासाठी महिनानिहाय किती खर्च आला, गाडीच्या लॉगबुकच्या प्रती, पुरवठा विभागासाठी वाहनावर केलेला खर्च त्याचप्रमाणे कलम ४ मधील १७ कामांची फार मोठ्या प्रमाणावर विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली असल्याचे दिसून येत आहे. ही माहिती एकत्र करण्यास जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाची साधनसामग्री व मनुष्यबळ मोठ्या प्रमाणावर वळवावे लागणार आहे.ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. अपिलार्थी यांनी अशा प्रकारची मोघम, विस्तृत व व्यापक स्वरुपाची माहिती मागितली असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील उद्दिष्टे सफल कशी होतात, असा प्रश्न उपस्थित होऊ शकतो.

या सर्व बाबी विचारात घेता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांनी मागितलेल्या माहितीची पाहणी देण्याची संधी देणे आवश्यक होते.तथापि त्यांनी ही बाब केलेली दिसून येत नाही. याकरिता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या छायांकीत प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी मागील सुनावणीस अनुपस्थित होते आणि आजही अनुपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलावरील निर्णयानंतरही अपिलार्थी यांना माहिती पुरविण्यात आलेली नाही. या बाबींचा विचार करता सदरचे प्रकरण गांभीर्यपूर्वक हाताळले गेले नाही या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. अत: अपिलार्थीस पाहणीनतंर सदरची माहिती विनामूल्य देण्यात यावी आणि या माहितीकरिता येणारा खर्च संबंधित तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी यांच्याकडून वसूल करुन घेण्यात यावा. तसेच या प्रकरणामध्ये राज्य माहिती आयोगाकडील सुनावणीस उपस्थित न राहणे, माहिती देण्यास विलंब करणे इत्यादीबाबतची

जिल्हाधिकारी, परभणी यांनी चौकशी करुन या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सहायक / अधिकारी यांची विभागीय चौकशी करावी, अशी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (२) नुसार आयोगातर्फे त्यांना शिफारस करण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

१. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पालम,जिल्हा परभणी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीसंदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी व वर निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे शुल्काची रक्कम संबंधितांकडून वसूल करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

२. जिल्हाधिकारी, परभणी यांनी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सहायक कर्मचारी / अधिकारी यांची अपिलार्थीस माहिती देण्यास विलंब करणे व आयोगापुढील सुनावणीस उपस्थित न राहणे याबाबत विभागीय चौकशी करावी अशी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (२) नुसार आयोगातर्फे त्यांना शिफारस करण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विलास विष्णुदास मोरे, मु.पो. गुगळीधामणगाव, ता. सेलू, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पालम, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सुरेश सुदामराव गायकवाड,<br>रा.मुरुम, ता.उमरगा, जि.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा प्रकल्प अधिकारी,<br>नगर परिषद प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,<br>उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/९२४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सुरेश सुदामराव गायकवाड | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - जिल्हा प्रकल्प अधिकारी, जिल्हा नागरी विकास यंत्रणा, जिल्हाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद - श्री. उदय सदाशिव कुर्वलकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | प्रतीवर तारीख नाही. |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २४.०१.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२.०४.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आयोगापुढील युक्तिवाद व अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांनी दाखल केलेला लेखी युक्तिवाद, उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी मुद्दा क्र. १ द्वारे- त्रयस्थ श्री. उदय एस.कुर्वलकर, जिल्हा प्रकल्प अधिकारी, जिल्हा नागरी विकास यंत्रणा,उस्मानाबाद यांच्या मालमत्तेसंदर्भात तसेच मुद्दा क्र. २ द्वारे मुरुम नगर परिषदेअंतर्गत स्थानिक निधी लेखा परिक्षण अहवालासंदर्भात व नगर परिषदेच्या फंडाबाबतची माहिती मागितली आहे. यासंदर्भात त्रयस्थ पक्षाच्या मालमत्तेबाबतची माहिती कलम 8(1)(j) मधील कसोटीवर उतरत नसल्यामुळे देय होत नाही व मुरुम नगर परिषदेअंतर्गत लेखापरिक्षणातील परिच्छेदासंदर्भात प्रचलीत पध्दतीप्रमाणे नमूद परिच्छेदाप्रमाणे अंमलबजावणी करुन तसेच अनुपालन सादर करावयाची प्रक्रिया असल्यामुळे ही माहिती अधिनियमातील कलम २(च)मध्ये बसत नाही, म्हणून देय होत नाही. उर्वरित माहिती नगरपरिषदेच्या फंडाबाबतची आहे व ही माहिती नगरपरिषदेकडे उपलब्ध असू शकते. अपिलार्थी यांच्या मूळ माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दि. १४.०१.२०११ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद दिल्याचे दिसून येत आहे. त्याचप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन अपिलार्थीचे अपील दि. १०.०३.२०११ रोजी निकाली काढले आहे.

या सर्व बाबी विचारात घेता सदरचे प्रकरण बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. अपिलार्थीने नगर परिषद, मुरुमकडेही या माहितीसंदर्भात अर्ज केल्याचे त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुरेश सुदामराव गायकवाड,रा.मुरुम, ता.उमरगा, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा प्रकल्प अधिकारी, जिल्हा नागरी विकास यंत्रणा, जिल्हाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. चंद्रकांत हरिभाऊ कापसे,<br>रा.कळंब, ता.कळंब, जि.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, कळंब, जि.उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी, भूम,<br>जि.उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/९६५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार,तहसील कार्यालय, कळंब, ता. कळंब, जि.उस्मानाबाद - श्री. बोंदर व्ही. ए. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, कळंब, जि.उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २०.१२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.०१.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०९.०२.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.०४.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दि. २०.१२.२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये मौ. रत्नापूर ता. कळंब येथील फेरफार क्र. ३०२ ची नक्कल मागितली आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, भूम यांच्याकडे दि. २०.०१.२०११ रोजी प्रथम अपील केले. त्यावर सुनावणी घेऊन दि. ०९.०२.२०११ रोजी निर्णय दिला की, अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत माहिती पुरविण्यात यावी. तहसीलदार, कळंब यांनी राज्य माहिती आयोगाच्या औरंगाबाद खंडपीठास दि. १३.०३.२०१२ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे की, अपिलार्थी यांनी अर्ज करुन विषयांकित माहितीची आज रोजी आवश्यकता नसल्याने आयोगाकडील अपील निकाली काढण्याची विनंती केली आहे. आयोगास ही बाब योग्य वाटत नाही. सदरची माहिती अपिलार्थीस देणे आवश्यक होते. तसे केलेले दिसून येत नाही. अपिलार्थी यांनी त्यांना आता माहितीची आवश्यकता नाही, असे कळविले आहे. तथापि सदरची मागितलेली माहिती सर्व जनतेस खुली करण्याच्या दृष्टीने दर्शनीफलकावर लावण्यात यावी व एक प्रत अपिलार्थीस पाठविण्यात यावी व या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यास विलंब का झाला याची संपूर्ण चौकशी जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी करावी, अशी अधिनियमातील कलम २०(२) अन्वये आयोगातर्फे शिफारस करण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

१) जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, कळंब, जि. उस्मानाबाद यांनी माहितीसंदर्भात वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत पूर्ण करावी.

२) जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यास विलंब का झाला याची संपूर्ण चौकशी करावी व दोषींवर यथोचित कारवाई योजावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. चंद्रकांत हरिभाऊ कापसे,रा.कथळे चौक, कळंब, ता.कळंब, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार,तहसीलदार कार्यालय, कळंब, ता. कळंब, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, कळंब, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सुभेदार मानकेश्वर वसंत,<br>रा. उस्मानाबाद. | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा),<br>तहसील कार्यालय, उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१०३७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सुभेदार मानकेश्वर वसंत | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधी - श्रीमती बी.बी.तोडकरी, अव्वल कारकून (पुरवठा). | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.०१.२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०२.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०६.०४.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.०४.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधी उपस्थित आहेत.जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. ०५.०१.२०११ रोजीच्या माहिती अर्जान्वये उस्मानाबाद तालुक्यातील प्रत्येक रेशन दुकानदारांमार्फत दरमहा वाटप होणाऱ्या रॉकेलचा तपशील, प्रत्येक कार्डधारकाच्या नावाची यादी व त्यांना वाटप केलेल्या रॉकेलची माहिती तसेच दुकानदाराकडील शिल्लक रॉकेलचा तपशील, नोव्हेंबर, २०१० या कालावधीतील तसेच किती कार्डधारकांना रॉकेल वाटप करण्यात आले, त्यांच्या कार्डाची छायांकित प्रत अशी माहिती मागितली आहे. अपिलार्थी यांना दि. ०१.०२.२०११ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, आपण दारिद्रयरेषेखालील नसल्याने स्वखर्चाने माहिती घेऊन जावी, असे कळविण्यात आले आहे. अपिलार्थी यांनी त्यांचे दि. १४.०३.२०११ रोजीचे प्रथम अपील तहसीलदार, उस्मानाबाद यांच्याकडे दाखल केले. तदनंतर दि. २२.०३.२०११ रोजी स्मरणपत्र दिले. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती विचारात घेता अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे अपिलार्थीस पाहणीसाठी उपलब्ध करुन द्यावेत व त्यातून त्यांना काही आवश्यक कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य देणे योग्य होईल, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.याबाबत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,उस्मानाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेली माहिती पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुभेदार मानकेश्वर वसंत, रा.यशवंतनगर, उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. महादेव केरबा अडमुटे,<br>रा. उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक निबंधक (प्रशासन),<br>सहकारी संस्था, उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१०४३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. महादेव केरबा अडमुटे | : | उपस्थित |
| ३.२ | अपिलार्थी यांचे वकील ॲड.सतीश पी. ढोबळे | | |
| ३.३ | जन माहिती अधिकारी - सहायक निबंधक (प्रशासन),<br>सहकारी संस्था,उस्मानाबाद - श्री.पवार उमेश उध्दवराव | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.०२.२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १४.०२.२०११ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०३.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.०४.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्यांचे वकील, जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी हे चतुर्थश्रेणी कर्मचारी सहकारी पतसंस्था,मर्या.उस्मानाबाद या संस्थेचे सदस्य आहेत. त्यामुळे त्यांना सहकारी संस्था अधिनियमाच्या कलम ३२ प्रमाणे त्यांना ही माहिती प्राप्त होऊ शकते. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, उस्मानाबाद यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर निर्णय दिलेला नाही. तथापि माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(f) मध्ये माहितीची व्याख्या दिलेली आहे व यामध्ये असेही स्पष्टपणे नमूद केले आहे की, खाजगी योजनेची माहिती जी अस्तित्त्वातील कायद्यानुसार सार्वजनिक प्राधिकरणाकडे उपलब्ध होऊ शकते, ती देय होत आहे. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, जि.उस्मानाबाद यांच्याकडे अर्ज केलेला आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जातील एकूण ५ मुद्यांपैकी ज्या माहितीची कागदपत्रे त्यांच्याकडे उपलब्ध होऊ शकतात, त्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना खातरजमा करावी लागेल. जसे मुद्दा क्र.१ संदर्भात लेखापरिक्षण अहवालाची प्रत -अशी - लेखापरिक्षण अहवाल- ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असते. ही माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी. उर्वरित चार मुद्यांबाबत या निर्णयाप्रमाणे उपलब्ध माहितीची पाहणी करुन जी उपलब्ध असेल, ती विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक (प्रशासन),सहकारी संस्था, उस्मानाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. महादेव केरबा अडमुटे, शासकीय रुग्णालय, शस्त्रक्रिया विभाग, उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक (प्रशासन),सहकारी संस्था, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुरेश नागनाथ बिराजदार, : अपिलार्थी
लोहारा (बु.),ता.लोहारा,जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्राम विकास अधिकारी,
ग्रामपंचायत लोहारा (बु.), ता.लोहारा,जि.उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिति,
लोहारा,जि.उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१०५६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सुरेश नागनाथ बिराजदार | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत लोहारा (बु.), ता.लोहारा,जि.उस्मानाबाद - श्री. चोरमले एस.एस. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिति, लोहारा,जि.उस्मानाबाद -श्री. वैरागे आर.ए. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०१.१०.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २३.११.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २०.१२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३०.०३.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.०४.२०११ (फेरसादर,दि. १६.०८.२०११) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोनही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती जी जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत लोहारा (बु.), ता. लोहारा, जि. उस्मानाबाद यांच्याकडे उपलब्ध आहे, ती दि. २३.११.२०१० रोजी अपिलार्थीस देण्यात आलेली आहे. तसेच उर्वरित माहिती जी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही, ती कोणत्या विभागाकडे उपलब्ध होऊ शकेल, हेही कळविलेले आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, लोहारा, जि.उस्मानाबाद यांनी सुनावणी घेऊन ग्रामसेवक यांनी अपिलार्थीस सर्व माहिती दिलेली आहे या निष्कर्षाप्रत येऊन, अपील निकाली काढले आहे. अपिलार्थी यांनी काही माहिती, जी दुसऱ्या विभागांकडे जसे सार्वजनिक बांधकाम विभाग, महसूल विभागाकडे उपलब्ध आहे, अशा माहितीकरिता त्या कार्यालयाकडे अर्ज करावा, असे सुनावणीच्यावेळी सर्वानुमते ठरले.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुरेश नागनाथ बिराजदार,मु. पो. लोहारा (बु.), ता. लोहारा,जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी,ग्रामपंचायत लोहारा (बु.), ता.लोहारा,जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, लोहारा, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. मुल्ला हसन बाशुमियॉ,<br>रा.कुन्हाळी, ता.उमरगा, जि.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपशिक्षणाधिकारी (मा.),<br>जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (मा.),<br>जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२४५४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मुल्ला हसन बाशुमियॉ | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -उपशिक्षणाधिकारी (मा.),<br>जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. कांबळे एम.के.,कक्ष अधिकारी | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (मा.),<br>जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.०६.२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.०८.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १२.०९.२०११ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०७.१०.२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाद्वारे त्रयस्थ श्री. मुसळे व श्री. लांडगे या शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यतेच्या संचिकेच्या झेरॉक्स प्रती मागितल्या आहेत. या मान्यतेच्या प्रती ज्या संचिकेत आहेत, त्या शोधण्याचे काम चालू आहे व संचिका प्राप्त होताच माहिती देण्यात येईल, असे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेताना नोंद घेतली असून त्याप्रमाणे निर्णय दिला आहे. उपलब्ध संचिका अभिलेखे वर्गीकरणाच्या वेळी सापडल्यामुळे प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी ठरल्याप्रमाणे दोन त्रयस्थांच्या वर नमूद केलेल्या संचिकेच्या झेरॉक्स प्रती (एकूण १२० पृष्ठे) अपिलार्थीस दि. २१.११.२०११ रोजी देण्यात आल्या व त्यासंदर्भात अपिलार्थी यांनी पोच दिलेली दिसून येत आहे. अपिलार्थी यांचे द्वितीय अपील दि. ०५.१०.२०११ रोजीचे आहे. तदनंतर त्यांना माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मुल्ला हसन बाशुनियाँ, मु.पो.कुन्हाळी, ता. उमरगा, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. किरण माणिकराव यादव,<br>रा. आराधवाडी तुळजापूर, ता. तुळजापूर, जि.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,<br>मौ. येवती, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, जि. उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२४६६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, येवती, तुळजापूर, जि.उस्मानाबाद - श्री. नवगिरे संजय सौदागर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, जि. उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. राऊत एस.एस.,विस्तार अधिकारी (पं.),पंचायत समिती, तुळजापूर, जि.उस्मानाबाद | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०४.०७.२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १६.०८.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १०.१०.२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे सन २०१० ते २०११ या कालावधीची ग्रामपंचायत कार्यालयात दलित वस्तीसंदर्भात विस्तृत माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, येवती, ता. तुळजापूर, जि.उस्मानाबाद यांनी त्यांच्या युक्तिवादात कथन केले की, त्यांनी एक महिन्यापासून चार्ज घेतलेला आहे. चार्ज घेतल्याबरोबर अपिलार्थीच्या माहितीच्या अर्जावर माहिती तयार ठेवण्यात आली आहे व अपिलार्थीस पाठविण्यात येत आहे.

अपिलार्थी आज अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,येवती, ता. तुळजापूर, जि.उस्मानाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. किरण माणिकराव यादव, रा. आराधवाडी, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,मौ. येवती,ता. तुळजापूर, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विलास हणमंतराव पाटील, : अपिलार्थी
रा. कदेर, ता.उमरगा, जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक,
लोकमान्य टिळक विद्यालय, कदेर, ता.उमरगा,
जि.उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (मा.),
जिल्हा परिषद, उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२४७४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. विलास हणमंतराव पाटील | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - मुख्याध्यापक,लोकमान्य टिळक विद्यालय, कदेर, ता.उमरगा, जि.उस्मानाबाद- श्री.गायकवाड एम.जी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (मा.),जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. कांबळे एम.के., क.अ. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १५.११.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.०१.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १८.०७.२०११ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १०.१०.२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे लोकमान्य टिळक विद्यालय,कदेर, ता.उमरगा या शाळेच्या शालेय समितीसंदर्भात एकूण तीन मुद्यांवर माहिती मागितली आहे. यातील मुद्दा क्र. ३ ची माहिती दि. १९.०७.२०११ रोजीच्या पत्राद्वारे प्राप्त झाली आहे व मुद्दा क्र. १ व २ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस मिळालेली नाही. मुख्याध्यापक यांनी सदरच्या माहितीचा शोध घेऊन ही माहिती पंधरा दिवसांत अपिलार्थीस देण्यात येईल, असे सुनावणीमध्ये कथन केले.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, लोकमान्य टिळक विद्यालय, कदेर, ता.उमरगा, जि.उस्मानाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थी यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ व २ संदर्भातील माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विलास हणमंतराव पाटील, मु.पो. कदेर, ता.उमरगा,जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,लोकमान्य टिळक विद्यालय, कदेर, ता.उमरगा, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.),जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना

या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.